cmyk

## संपादकीय

### सरकारी यंत्रणांचे वागणे सैराटच!

मुंबई उच्च न्यायालयाने राणा यांचे जात प्रमाणपत्र २०२१ मध्ये अवैध ठरवले होते. राणा यांनी बनावट कागदपत्रांचा वापर करून 'मोची' जात प्रमाणपत्र मिळविल्याचे उच्च न्यायालयाने म्हटले होते आणि राणा यांना दोन लाखांचा दंड ठोठावला होता. राणा या 'शीख-चमार' जातीच्या असल्याचे नोंदीवरून सूचित होत नसल्याचे न्यायालयाने म्हटले होते. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात राणा यांनी केलेल्या याचिकेला सर्वोच्च न्यायालयाने मान्यता दिली. राणा यांच्या जात प्रमाणपत्राबद्दल छाननी समितीने जो अहवाल दिला

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### सीबीएसईने पुन्हा ११ वी आणि १२ वीचा अभ्यासक्रम बदलला

मुंबईः केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ ने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० शी संरेखित करण्यासाठी २०२४-२५ शैक्षणिक सत्रापासून सुरू होणाऱ्या इयत्ता ११ आणि १२ वीच्या वर्षअखेरीच्या परीक्षांच्या स्वरूपामध्ये बदल केले आहेत. सुधारित मार्गदर्शक तत्त्वांनुसार, बोर्डाने गेल्या वर्षीच्या तुलनेत सक्षमतेवर आधारित प्रश्नांचे वेटेज १०% ने वाढवले आहे आणि लहान आणि दीर्घ स्वरूपाच्या उत्तरांचे वेटेज कमी केले आहे. एमसीक्यूएस/केस-आधारित प्रश्न, स्त्रोत-आधारित एकात्मिक प्रश्न किंवा ११ वी आणि १२ वी या दोन्ही वर्गातील इतर कोणत्याही प्रकारचे सक्षमता-केंद्रित प्रश्न आता ४०% वरून ५०% करण्यात आले आहेत.

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ०३ | अंक-३५५ | रविवार दि.०७ एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | ▪ पाने- ६ | किंमत ३ रूपये

# भारत २०२५ च्या अखेरीस युरिया उत्पादनात स्वयंपूर्ण होणार

## आयातही करणार बंद : मांडविया

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**देशात युरियाची वाढती मागणी पाहता केंद्र सरकाराला मोठ्या प्रमाणात युरिया आयात करावी लागत होती. मात्र आता देशातील युरिया उत्पादन वाढणार असून युरियाचा तुटवडा भासणार नाही. देश युरिया उत्पादनात स्वयंपूर्ण होईल. यामुळे २०२५ अखेरीस युरिया आयात केली जाणार नाही, असा दावा देशाचे रसायने आणि खते मंत्री मनसुख मांडविया यांनी केला आहे.**

पीटीआय या वृत्तसंस्थेशी बोलताना मांडविया म्हणाले, याआधी देशातील अनेक राज्यांमध्ये युरियाचा तुटवडा असल्याच्या बातम्या अनेकदा येत होत्या. या बातम्यांमध्ये शेतकरी रांगेत उभे असल्याचे दिसून येत होते. पण, पुढील वर्षीपासून ही परिस्थिती बदलणार आहे. मांडविया म्हणाले, पर्यायी खतांचा वापर पीक आणि मातीच्या गुणवत्तेसाठी महत्वाचा आहे. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार चालना देत आहे. सरकारने युरिया आयातीवरील अवलंबित्व दूर करण्यासाठी द्विपक्षीय धोरण अवलंबले आहे. या धोरणानुसार चार बंद असलेले युरिया प्रकल्प पुन्हा सुरू करण्यात आले आहेत. तर आणखी एक कारखाना सुरू करण्याचे काम सुरू आहे. देशांतर्गत युरियाची मागणी पूर्ण करण्यासाठी दरवर्षी सुमारे ३५० लाख टन युरिया लागतो. २०१४-१५ मध्ये देशांतर्गत युरिया उत्पादन क्षमता २२५ होती. जी यंदा वाढली आहे. यंदा देशांतर्गत ३१० लाख टन युरियाचे उत्पादन झाल्याची माहिती मांडविया यांनी दिली आहे. मांडविया म्हणाले, सध्या वार्षिक देशांतर्गत उत्पादन आणि मागणी यांच्यातील तफावत ४० लाख टनांची आहे. पण ही देखील तफावत पाचवा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर दूर होईल. तर युरिया उत्पादन ३२५ लाख टनांपर्यंत पोहोचेल. याचबरोबर देशातील २० ते २५ लाख टन युरियाच्या ऐवजी नॅनो लिक्विड युरियाचा वापर व्हावा, असे सरकारचे लक्ष असल्याचेही मांडविया म्हणाले.

◀◀ पान २ वर



## सोयाबीन उत्पादक शेतकरी विवंचनेत

### हंगाम सरला पण भावात सुधारणा नाहीच!

**पुणे । प्रतिनिधी**

**गेल्या वर्षी खरिपात सुरुवातीपासूनच सोयाबीन दर कमी असल्याने, शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने योग्य भाव मिळेल, यासाठी सोयाबीन घरात साठवून ठेवली होती. मात्र, आता नवीन पेरणी हंगाम दोन महिन्यांवर आला आहे. तरी सोयाबीनचे दर हमीभावापेक्षा कमी असलेले पाहायला मिळत आहेत. त्यामुळे सध्या सोयाबीन उत्पादक शेतकरी मोठ्या विवंचनेत सापडले आहेत.**

राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांमागील शुक्लकाष्ट संपण्याचे नाव घेत नाही. यावर्षीचा खरीप हंगाम अवघा काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांना बियाणे, खते यासाठी आर्थिक तजवीज करावी लागणार आहे. मात्र, असे असूनही गेल्या सहा महिन्यापासून हमीभावापेक्षा कमी असलेले सोयाबीन दर सुधारण्याचे नाव घेत नाही. महाराष्ट्र हे देशातील क्रमांक दोनचे सर्वाधिक सोयाबीन उत्पादन

◀◀ पान २ वर

# आ.प्रकाश सोळंके यांच्या स्वीय सहाय्यकाला मारहाण; व्हिडीओ व्हायरल

## मारहाण करणारा तरुण भाजप तालुका अध्यक्षांचा पुतण्या, सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**माजलगाव । प्रतिनिधी**

**येथील मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाचे आमदार प्रकाश सोळंके यांचे स्वीय सहायक महादु सोळंके यांना दि.०५ एप्रिल शुक्रवार रोजी अजयसिंह राऊत याने भर दिवसा रस्त्यावर बेदम मारहाण केली. याचा एक व्हिडीओ सध्या सोशल मिडीयावर व्हायरल झाला आहे. मारहाण करणारा अजयसिंह हा भाजपचे तालुका अध्यक्ष अरूण राऊत यांचा पुतण्या आहे. याप्रकरणी स्वीय साह्यक महादेव सोळंके यांच्या फिर्यादीवरून दि.०६ एप्रिल शनिवार रोजी सायंकाळी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात सातजणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.**

मराठा आरक्षण आंदोलन सुरू असताना आंदोलकांकडून आ. प्रकाश सोळंके यांचे घर जाळण्यात आले होते होते. यावेळी अनेक युवकांवर गुन्हे दाखल झाले होते. यानंतर अनेक महिने अनेक युवक जामीन मिळत नसल्यामुळे त्रस्त झाले होते. यामध्ये माजलगावचे भाजप तालुकाध्यक्ष अरूण राऊत यांचे पुतणे अजयसिंह राऊत यांच्यावर देखील गुन्हा दाखल झाला होता. दि ०५ एप्रिल शुक्रवार रोजी सायंकाळच्या सुमारास आ. प्रकाश सोळंके यांचे स्वीय साह्यक महादु सोळंके हे रंगोली कॉर्नर येथील सलून मध्ये आले होते. यावेळी अजयसिंह राऊत यांनी त्यांना बाहेर बोलावून घेतले. जाळपोळ प्रकरणात आमची नावे विनाकारण का गोवलीस? असा जाब विचारत महादू सोळंके यांच्यासोबत हुज्जत घातली. त्यानंतर भररस्त्यात महादु सोळंके यांना मारहाण

◀◀ पान २ वर



### महाराष्ट्रासह ८ राज्यांत उष्णतेची लाट

नवी दिल्लीः देशातील ८ राज्यांमध्ये उष्णतेची लाट सुरू आहे. यामध्ये महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, ओडिशा, झारखंड, बिहार आणि पश्चिम बंगालचा समावेश आहे. यापैकी बहुतांश राज्यांमध्ये तापमान ४३ अंश सेल्सिअसवर किंवा त्यापुढे पोहोचले आहे. उर्वरित उन्हाळ्यातही विक्रमी उष्णता होण्याची शक्यता आहे.

८ राज्यांमध्ये उष्णतेची लाट असताना भारतीय हवामान खात्याने राजस्थान, मध्य प्रदेश, आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेश, केरळ आणि सिक्कीम या राज्यांमध्ये मात्र पावसाचा अंदाज वर्तवला आहे. याशिवाय जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेश अशा डोंगराळ राज्यांमध्ये काही ठिकाणी बर्फवृष्टी सुरू आहे तर याच राज्यांमध्ये काही ठिकाणी आणखी बर्फवृष्टी होण्याची शक्यता आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार मध्य प्रदेशातील ३३ जिल्ह्यांमध्ये गारांसह पावसाची शक्यता आहे.

# दैनिक राज्य लोकतंत्रचे आदर्श शेतकरी व आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर

## डॉ.ओमप्रकाश शेटे, पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, एस. एम. देशमुख, गौतम खटोड, दत्ता बारगजे, गोवर्धन दराडे यांच्या उपस्थितीत उद्या पार पडणार पुरस्कार वितरण सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

अल्पावधीतच बीड जिल्ह्यामध्ये नावारूपास आलेल्या दैनिक राज्य लोकतंत्रच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त आदर्श शेतकरी आणि आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर करण्यात आले आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला सोमवार, दिनांक ८ एप्रिल रोजी सायंकाळी सहा वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे पार पडणार आहे. यावेळी आयुष्यमान भारत- मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डा. ओमप्रकाश शेटे, पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस एम देशमुख, सामाजिक कार्यकर्ते गौतम खटोड, इन्फंट इंडियाचे संचालक दत्तामामा बारगजे आणि पसायदान सेवा प्रकल्पचे संचालक गोवर्धन दराडे या मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.

◀◀ पान २ वर



### आदर्श शेतकरी पुरस्कार

१) गोकुळ नखाते, रा. आवरगाव, ता. धारूर, २) भागवत मोरे, रा. कारी, ता. धारूर, ३) बप्पासाहेब डावकर, रा. मौज, ता. बीड, ४) प्रल्हाद गवारे, रा. चिंचवडगाव, ता. वडवणी, ५) भागवत ठोंबरे, रा. दिंद्रुड, ता. माजलगाव, ६) अड शरद किशनराव नाईकनवरे, रा. माजलगाव ७) शहाजीराव भोसले, रा. सांगवी, ता. आष्टी, ८) बाजीराव जाधव, रा. वरंगलवाडी, ता. शिरूर, ९) पंडितराव लांडे, रा. घाटसावळी, ता. बीड, १०) आदिनाथ गवारे, रा. काडीवडगाव ( चिंचवडगाव), ११) अमोल लंबे, रा. सिरसमार्ग, ता. गेवराई

### अकरा आदर्श सरपंच

१) अशोक सोळंके, बोरगाव, ता. माजलगाव, २) भगवान कांदे, संगम, ता. धारूर, ३) अशोक चोले, खडकी, ता. वडवणी,, ४) भागवत दराडे, जैतापूर, ता. धारूर, ५) मयूर आंधळे, रुई पिंपळा, ता. वडवणी, ६) पुष्पाताई खकाळ, शेरी, खकाळवाडी, ता. आष्टी ७) सौ. सागर शहादेव खेडकर, सावरगाव चकला, ता. शिरूर, ८) सौ. संगीता भास्कर सानप, फुलसांगवी, ता. शिरूर, ९) सौ, प्रीती अमोल बागलाने, काकडहिरा, ता. , बीड, १०) अजय घोडके, लोळदगाव, ता. बीड, ११)सौ. त्रिवेणी दशरथराव उगले, ममदापुर पाटोदा, ता. आंबाजोगाई

### सातारा साज संगीत रजनीचा कार्यक्रम

पुरस्कार वितरण सोहळ्याबरोबरच पश्चिम महाराष्ट्रामध्ये लोकप्रिय असलेल्या वीरेंद्र केंजळे प्रस्तुत सातारा साज या संगीत रजनीचा कार्यक्रमही होणार आहे. यावेळी भावगीते, लोकगीतांसह हिंदी व मराठी लोकप्रिय गीतांची मैफल रंगणार आहे.

## देशाच्या संविधानाशी एकनिष्ठ असले पाहिजे

### ● लोकसभा निवडणुकीपूर्वी सरन्यायाधीशांची महत्त्वपूर्ण टिप्पणी

**नागपूर । प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीपूर्वी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी महत्त्वपूर्ण टिप्पणी केली आहे. वकील आणि न्यायाधीशांनी संविधानाशी एकनिष्ठ असले पाहिजे, यावर त्यांनी भर दिला. सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी न्यायाधीशांनी पक्षपाती नसणे महत्त्वाचे असल्याचे म्हटले.**



नागपूर हायकोर्ट बार असोसिएशनच्या शताब्दी सोहळ्यात न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड म्हणाले की, ''आमच्यासारख्या चैतन्यशील आणि तर्कशुद्ध लोकशाहीमध्ये बहुतांश लोकांचा कल कोणत्या ना कोणत्या राजकीय विचारसरणीकडे असतो.'' ॲरिस्टॉटल म्हणाले होते की, मानव हा राजकीय प्राणी आहे आणि वकील याला अपवाद नाहीत. तथापि, बारच्या सदस्यांनी न्यायालय आणि संविधानाशी पक्षपात करू नये.'' देशाच्या सरन्यायाधीशांनी भारताच्या न्यायव्यवस्थेबाबत महत्त्वपूर्ण भाष्य केले आहे. ते म्हणाले की न्यायपालिका आपल्या स्वातंत्र्यासाठी आणि पक्षपातीपणासाठी, कार्यकारिणी, कायदेमंडळ

◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०५ एप्रिल २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ३५.५० क्विंटल | २,२५० | ३,१४५ | २,६६६ |
| ज्वारी/हायब्रिड :२१७.५० क्विंटल | १,६०० | ३,५०० | २,६६८ |
| मूग :०.५० क्विंटल | ९,२०१ | ९,२०१ | ९,२०१ |
| तूर : ८५.५० क्विंटल | ६,००० | १०,३०३ | ९,१८८ |
| उडीद : २.०० क्विंटल | ७,३०० | ९,६०१ | ८,९७५ |
| बाजरी: ४.५० क्विंटल | २,७२१ | २,७२१ | २,७२१ |
| चिंचोका/लोकल: ११.०० क्विंटल | २,००० | २,००० | २,००० |
| सोयाबीन: १४२.०० क्विंटल | ४,५४० | ४,६०० | ४,५६३ |
| हरभरा: २२.५० क्विंटल | ५,३०० | ५,५२० | ५,४३० |

## सांगली मतदारसंघाचा वाद आता दिल्ली दरबारी

### कदम-राऊत यांच्यात तू तू मै मै

**सांगली । प्रतिनिधी**

काँग्रेसचा परंपरागत लोकसभा मतदारसंघ म्हणून ओळखला जाणारा सांगली लोकसभा मतदारसंघावर अचानक शिवसेना उबाठा गटाने दावा करत त्या जागेवर महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांना उमेदवारीही जाहिर केली. मात्र काँग्रेसचे संभावित उमेदवार विशाल पाटील आणि विश्वजीत कदम यांनी यावर आक्षेप घेतला आहे. विश्वजीत कदम आणि शिवसेना उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांच्यात तू तू मै मै सुरु झाले आहे. आता हा वाद थेट दिल्लीतून हाय कंमाडकडून मिटविला जाणार आहे.

वास्तविक पाहता सांगली हा मतदारसंघ हा काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून राहिला आहे. यापूर्वी काँग्रेसचे नेते वसंतदादा पाटील आणि त्यांच्यानंतर त्यांचे नातू, मुलगे आदींनी या मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या चर्चे दरम्यान सुरुवातीला वंचित बहुजन आघाडीने चंद्रहार पाटील यांना उमेदवारी जाहिर केली. तर त्यानंतर शिवसेना उबाठा गटाने या उमेदवारालाच पळवून आणत शिवसेना उबाठा गटाच्या वतीने उमेदवारी जाहिर केली. तरीही काँग्रेसने या लोकसभा मतदारसंघावरील हक्क सोडला नाही. दरम्यान शिवसेना उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी सांगली लोकसभा मतदारसंघातून चंद्रहार पाटील यांच्या प्रचाराला सुरुवातही केली. यावरून संजय राऊत यांना विचारले असता ते म्हणाले की, यापूर्वीच काँग्रेसला सांगून हा मतदारसंघ आम्ही घेतला आहे. मात्र स्थानिक नेत्यांनी यात कारण

◀◀ पान २ वर




cmyk

अग्रलेख

# सरकारी यंत्रणांचे वागणे सैराटच!

मुंबई उच्च न्यायालयाने राणा यांचे जात प्रमाणपत्र २०२१ मध्ये अवैध ठरवले होते. राणा यांनी बनावट कागदपत्रांचा वापर करून 'मोची' जात प्रमाणपत्र मिळविल्याचे उच्च न्यायालयाने म्हटले होते आणि राणा यांना दोन लाखांचा दंड ठोठावला होता. राणा या 'शीख-चमार' जातीच्या असल्याचे नोंदीवरून सूचित होत नसल्याचे न्यायालयाने म्हटले होते. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात राणा यांनी केलेल्या याचिकेला सर्वोच्च न्यायालयाने मान्यता दिली. राणा यांच्या जात प्रमाणपत्राबद्दल छाननी समितीने जो अहवाल दिला, त्यामध्ये उच्च न्यायालयाने हस्तक्षेप करावयास नको होता, असे न्या. जे. के. महेश्वरी आणि न्या. संजय करोळ यांच्या पीठाने म्हटले आहे. राणा यांना लोकसभा निवडणुकीत अमरावती मतदारसंघातून भाजपने उमेदवारी दिली आहे.

या मतदारसंघातून उमेदवारी अर्ज भरण्याचा गुरुवार हा अखेरचा दिवस होता. राणा यांना देण्यात आलेले जात प्रमाणपत्र वैध असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने ग्राह्य धरले. छाननी समिती त्यांच्यासमोर असलेल्या कागदपत्रांचा योग्य विचार करते आणि नैसर्गिक न्यायाचे पालन करून आपला निर्णय घेते, असे पीठाने म्हटले आहे. या सर्व बाबींचा सारासार विचार करून उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय रद्दबातल ठरविण्यात येत असल्याचे पीठाने म्हटले आहे. २०१९ मध्ये अमरावती मतदारसंघातून नवनीत राणा विजयी झाल्यावर त्यांचे २०२१ मध्ये जात प्रमाणपत्र रद्द झाले होते. त्यांनी या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. उर्वरित काळात त्यांची खासदारकी कायम राहिली होती. अलिकडेच राणा यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आणि त्यांना अमरावतीची उमेदवारी देण्यात आली. २०१९ मध्ये नवनीत राणा काँग्रेस-राष्ट्रवादीच्या पाठिंब्यावर सेना-भाजप युतीच्या विरोधात अपक्ष म्हणून निवडून आल्या होत्या. पण नंतर त्यांची भाजपशी जवळिक वाढली. त्यांनी केंद्रात मोदींना समर्थन दिले होते. राज्यात महाविकास आघाडी सरकारविरोधात आंदोलनही केले होते. आता सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे नवनीत राणा यांना दिलासा मिळाला आहे. परंतु असा दिलासा रामटेकच्या काँग्रेस उमेदवार रश्मी बर्वे यांना मात्र मिळाला नाही. रामटेक लोकसभा मतदारसंघातून रश्मी बर्वे यांनी काँग्रेसकडून उमेदवारी अर्ज भरला. मात्र त्यावर आक्षेप घेण्यात आल्यानंतर चौकशीसाठी सरकारी यंत्रणा इतकी तत्परतेने वागली की एक दिवसात चौकशी व अन्य प्रक्रिया पार पाडून जात पडताळणी समितीने त्यांचा अर्ज रद्द केला. त्यामुळे त्यांचा उमेदवारी अर्जही बाद झाला. त्यांनी समितीच्या निर्णयाविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाद मागितली. उच्च न्यायालयाने गुरुवारी जात वैधता समितीच्या निर्णयाला स्थगिती देत रश्मी बर्वे यांना दिलासा दिला, मात्र निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्याने त्यात हस्तक्षेप करण्यास नकार दिला. त्यामुळे बर्वे यांना दिलासा मिळाला असला तरी त्या निवडणूक लढवू शकणार नाहीत. राजकीयदृष्ट्या हे दोन्ही निकाल भाजपच्या पथ्यावर पडले आहेत! रश्मी बर्वे प्रकरणी नागपूर खंडपीठात पुढील सुनावणी २२ एप्रिल रोजी होणार आहे परंतु तोवर रामटेक मतदारसंघासाठीचे मतदान पार पडलेले असेल. म्हणजे रश्मी बर्वे यांना जात वैधता प्रमाणपत्र रद्द केल्याप्रकरणी दिलासा मिळाला असला तरी त्यांची उमेदवारी खारीज केल्याप्रकरणी दिलासा मिळालेला नाही. म्हणजेच दोन्ही प्रकरणांत एकच निकाल आला असला तरी परिणाम मात्र वेगळे झाले आहेत. रामटेक तालुक्यातील सुनील साळवे नावाच्या स्थानिक पत्रकाराने रश्मी बर्वे यांच्या जात प्रमाणपत्रावर आक्षेप घेतला होता. त्याने जात पडताळणी समितीकडे तक्रार केली होती. मात्र, समितीने खासगी माहिती देऊ शकत नाही असे कारण देत त्याचा अर्ज फेटाळला होता. सुनील साळवेने माहिती आयुक्तालयाकडेही माहिती मागितली होती आणि काही प्रमाणात माहिती मिळवली होती. माहिती आयुक्तालयाला जात प्रमाणपत्राबद्दल माहिती मागविण्याचे अधिकार नाहीत असा युक्तिवाद बर्वे यांच्या वकिलांनी केला होता आणि कोर्टाने तो मान्य केला होता. हायकोर्टात सुनावणी सुरू असताना राज्य सरकारच्या सामाजिक न्याय विभागाकडेही चौकशीची मागणी झाली होती. जात पडताळणी समितीला हायकोर्टाच्या हस्तक्षेपाशिवाय पुनर्विचार करायचा किंवा रद्द करायचा अधिकार नसतो, त्यांना नोटीस पाठवण्याचाही अधिकार नसतो. तरीही जात पडताळणी समितीने नोटीस कशी काय पाठवली? हे सारे राजकीय दबावापोटी झाले असावे हे उघड आहे. नवनीत राणा यांचे जात वैधता प्रमाणपत्र उच्च न्यायालयाने रद्द केले होते.

सर्वोच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित राहून राणा पाच वर्षे खासदार पदावर राहिल्या आणि आता त्यांना भाजपने उमेदवारीही दिली. दुसरीकडे काँग्रेसच्या रामटेकच्या उमेदवार रश्मी बर्वे यांच्या जात प्रमाणपत्राबाबत समितीने २० मार्च रोजी नोटीस दिली आणि आठ दिवसांत हे प्रमाणपत्र रद्दही केले. रामटेक मतदारसंघात रश्मी बर्वे यांचे पारडे जड असल्याचे पाहून त्यांच्या विरोधात भाजपने साम-दाम-दंड-भेद सूत्राचा वापर केला काय? लोकशाहीचा उत्सव समजल्या जाणाऱ्या देशाच्या लोकसभा निवडणुकीत सरकारी यंत्रणांचे नि:पक्ष वागणे अपेक्षित असताना यंत्रणा त्याविरुद्ध आचरण करत आहेत हे स्पष्टपणे दिसते आहे. त्यामुळेच रश्मी बर्वे यांचे जात प्रमाणपत्र समितीने रद्द केले आहे. काहीही करून 'चार सौ पार' जायचे हे भाजपचे ध्येय आहे.

## तापमानाचा कहर, दुचाकीचा कोळसा

लातूर । प्रतिनिधी

**लातूर शहर व परिसराच्या तापमानात दिवसेंदिवस वाढ होत आहे. शनिवारी तापमानाचा पारा ३९ अंशसेल्सिअसपेक्षास्त होता. सूर्य आग ओकत होता. त्यामुळे येथील जिल्हा न्यायालयासमोरी रोडवर एम. एच. २४, बीई ०८४५ या क्रमांकाची दुचाकी जळून कोळसा झाली. चालत्या दुचाकीतून धुर निघाला आणि पाहता पाहता दुचाकी आगीच्या लोळात जळून खाक झाली.**

सध्या सूर्य आग ओकत असल्यामुळे तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. तापमानाने चाळीसी घाठली आहे. एप्रिल, मे महिन्यात उष्णतेची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता आहे. सकाळी सूर्योदयापासूनच उन्हाचा तडाखा सुरु होतो. दुपारी उन्हाच्या झळांनी जीव कासावीस होत आहे. यंदा मार्च महिन्यापासून जिल्ह्यात कमाल तापमानात वाढ झाली आहे. मार्च महिन्यात ३८ अंशाच्या पुढे तापमान सरकण्यास सूरुवात झाली. ३० मार्चपासून ६ एप्रिलपर्यंत ३८ ते ३९ अंश सेल्सिअस तापमान नोंदले गेले आहे. ज्ञानेश्वर सूर्यवंश दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास छत्रपती शिवाजी महाराज चौकातून महात्मा गांधी चौकाकडे सदर दुचाकीवरुन निघाले होते. चालत्या दुचाकीतून धुर निघत असल्याचे कोणीतरी सूर्यवंशी यांच्या लक्षात आणुन दिले. त्यांनी तत्काळ दुकचाी रस्त्याकडेला घेऊन थांबवी. पाहता पाहता दुचाकी जळून खाक झाली असून अग्निशन दलाने तत्काळ घटनास्थळी पोहोचून दुचाकीला लागलेली आग आटोक्यात आणली परतू, तोपर्यंत दुचाकी पुर्णत: जळून भस्म झाली होती.

## देशातील लोकशाही धोक्यात, संविधान बदलण्याचे प्रयत्न

जयपूर । वृतसंस्था

**लोकसभा निवडणूक जवळ आली आहे, त्यामुळे सर्वच पक्ष आपला जोरदार प्रचार करत आहेत. काँग्रेसच्या माजी अध्यक्ष खा.सोनिया गांधी यांनी शनिवार दि. ६ एप्रिल रोजी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवर जोरदार हल्ला चढवला. राजस्थानच्या जयपूरमध्ये एका जाहीर सभेला संबोधित करताना त्या म्हणाल्या की, गेल्या १० वर्षांपासून आपला देश अशा सरकारच्या ताब्यात आहे, ज्याने महागाई आणि बेरोजगारीशिवाय काहीही दिले नाही. सरकारने सर्वसामान्य जनतेचा छळ केला, अशी टीका त्यांनी केली.**

सोनिया गांधी पुढे म्हणाल्या, आपल्या महान पूर्वजांनी कठोर संघर्षाच्या जोरावर देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. इतक्या वर्षांनंतर आता सर्वत्र अन्यायाचा अंधार पसरला आहे. याविरुद्ध लढून न्यायाचा दिवा पेटवण्याचा संकल्प आपण सर्वांनी केला पाहिजे. देशापेक्षा कोणी मोठा असू शकतो का? जो असा विचार करेल, त्याला देशातील जनता धडा शिकवतील. दुर्दैवाने आज असे नेते आपल्या देशात सत्तेवर आहेत, जे स्वत:ला महान समजतात आणि लोकशाहीचे वस्त्रहरण करतात. विरोधी पक्षांच्या नेत्यांना धमकावून भाजपमध्ये घेतले जाते. आपल्या देशाची लोकशाही धोक्यात आली आहे. कष्टाने उभारलेल्या लोकशाही संस्था राजकीय हस्तक्षेपामुळे उद्ध्वस्त होत आहेत. आपली राज्यघटना बदलण्याचे षडयंत्र रचले जात आहे. या हुकूमशाहीला आपण आपण उत्तर देऊ.

### शेतकऱ्यांची मुले बेरोजगार

रोजच्या कमाईतून अन्न मिळवणेही कठीण झाले आहे. कष्टकरी कामगारांच्या कष्टाचे मोल कमी होत आहे. स्वयंपाकघराचा खर्च देशातील महिलांची रोजचे परीक्षा घेतो. शेतकरी आणि मध्यमवर्गीय कुटुंबातील मुले बेरोजगार आहेत. गरीब माणसाने कितीही प्रयत्न केले तरी, वर येऊ शकत नाहीत. मित्रांनो, आज देश तुमची वाट पाहत आहे. त्यामुळेच काँग्रेसने आपला जाहीरनामा पाच भागात विभागला आहे. मला विश्वास आहे की, काँग्रेसचे सहकारी कठोर परिश्रम करेल आणि प्रत्येक संकल्प आणि हमी देशाच्या कानाकोपऱ्यात नेण्यात कोणतीही कसर सोडणार नाहीत.

# पंकजा मुंडे यांच्या प्रचारार्थ आ.सुरेश धस जिल्ह्यात आघाडीवर..

## पालकमंत्री असताना सर्वात जास्त निधी आणि विकास कामे ही पंकजाताई मुंडे यांच्यामुळेच-आ.सुरेश धस

आष्टी । पतिनिधी

**सन २०१४-२०१९ या भारतीय जनता पार्टी, शिवसेना महायुतीच्या शासनामध्ये पंकजाताईसाहेब मुंडे या ग्रामविकास मंत्री आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री असताना स्वातंत्र्य मिळाल्यापासून सर्वात जास्त निधी बीड जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांनीच आणलेला आहे.. मराठा आरक्षण प्रश्नामुळे समाज मन एकत्रित आलेले आहे आणि राज्य शासनाने दिलेले मराठा आरक्षण हे न्यायालयीन प्रक्रियेमध्ये टिकणारे असेल असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजितदादा पवार यांनी दिलेले असल्यामुळे.. सामाजिक भान राखून सर्व जबाबदार कार्यकर्त्यांनी गावातील प्रमुखांनी जनतेपर्यंत जाऊन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या कामाची माहिती द्यावी आणि आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीच्या उमेदवार राष्ट्रीय सचिव पंकजाताई साहेब मुंडे यांना मोठ्या मताधिक्याने लोकसभेत पाठवावे असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले.**

बीड लोकसभा निवडणुकीतील भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, राष्ट्रीय समाज पार्टी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या महायुतीच्या उमेदवार भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी धामणगाव जिल्हा परिषद गट व मुर्शदपुर गटातील प्रमुख पदाधिकारी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य,सेवा सोसायटीचे चेअरमन यांच्यासह प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीमध्ये मार्गदर्शन करताना ते बोलत होते. ते पुढे म्हणाले.. पंकजाताई मुंडे या राज्याच्या ग्रामविकास मंत्री आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री असताना स्वातंत्र्यापासून सर्वात जास्त निधी त्यांनी बीड जिल्ह्यासाठी दिला असून वाड्यावर,वसत्यांवर. तांड्यापर्यंत च्या ठिकाणी पक्के रस्ते तसेच पिण्याच्या पाण्याची सोय केलेली आहे.. तसेच अहमदनगर बीड रेल्वे मार्गासाठी राज्य आणि केंद्र शासनाचा निधी त्यांच्यामुळेच मिळालेला असून अहमदनगर ते अमळनेर पर्यंत रेल्वे धावली आहे तसेच केंद्र शासनाच्या माध्यमातून अनेक राष्ट्रीय महामार्ग, राज्यमार्ग, ग्रामीण मार्ग, ग्राम विकास विभाग अंतर्गत ग्रामीण मार्ग मोठ्या प्रमाणावर पूर्ण झालेले आहेत असे सांगत.. सद्यस्थितीमध्ये मराठा आरक्षणामुळे समाजामध्ये



अनेक शंका कुशंका व्यक्त केल्या जात आहेत. मात्र देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनीच मराठा समाजाला आरक्षण दिले होते परंतु त्यानंतर सत्ता बदल होऊन सत्तेवर आलेल्या महाविकास आघाडीच्या काळामध्ये या प्रश्नाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे हे आरक्षण न्यायालयीन प्रक्रियेत टिकले नाही.. मात्र सध्याच्या राज्य शासनाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रोटोकॉल बाजूला ठेवून मराठा समाजाच्या भावना समजून घेतल्या आणि मराठा समाजाला शैक्षणिक आणि सामाजिक १० टक्के आरक्षण मंजूर केले आहे तसेच सगे सोयऱ्यांच्या बाबतही हे सरकार सकारात्मक असून हरकतीच्या पडताळणी नंतर त्या बाबतीत निर्णय होणार आहे.. मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी सकारात्मक रीतीने मागासवर्गीय आयोगाकडे माहिती सादर केलेली आहे त्यामुळे हे मराठा आरक्षण टिकणारे आहे असा विश्वास सर्वांनाच वाटत आहे असे असताना मात्र मराठा समाजाच्या मूक मोर्चांना ''मुका मोर्चा ''अशी टिंगल महाविकास आघाडीतील काही नेते करत होते. मात्र ज्या नेतृत्वाने मराठा समाजाला खऱ्या अर्थाने आरक्षण दिले आणि त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला अशा माणसाची जात काढून त्याला बदनाम करण्याचा काही प्रवृत्ती प्रयत्न करत आहेत हे अत्यंत दुर्दैवी आहे. इतर मागासवर्गीय समाजाच्या सर्व सवलती या आरक्षणामुळे मिळत असून या शासनाने शैक्षणिक धोरणामध्ये देखील बदल करून शैक्षणिक वर्षात राज्यातील सर्व समाजातील मुलींची शैक्षणिक फीस राज्य शासन भरणार आहे. आपल्या जवळच्या कार्यकर्त्यांनी या सर्व बाबी समाजामध्ये जाऊन समजावून सांगण्याची आवश्यकता आहे.. आपले राजकीय विरोधक समाजामध्ये सामाजिक दुहेरी पसरवण्याचे काम करत असून चुकीचे बोलत असतील. सामाजिक समतोल बिघडवण्याचे काम करत असतील.. तर त्यांना गावोगावातील प्रमुख मंडळींनी जागेवर चोख उत्तर द्यावे.. आपण सर्वजण दररोज जनतेच्या सुखा दुखात सहभागी आहोत. त्यामुळे जो कार्यकर्ता दररोज सुखदु:खात सहभागी असतो त्याचेच मतदार ऐकत असतात.ज्या राजकीय पक्षाने मराठा समाजाला सत्ता असताना आरक्षणासाठी विरोध केला. त्या लोकांना आता मराठा आरक्षणाचा पुळका आलेला असला तरी मतदार राजा सुज्ञ आहे त्यांना सर्व इतिहास ठाऊक आहे. त्यामुळे सर्व प्रमुख कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीच्या आणि मित्र पक्षांच्या महायुतीच्या उमेदवार भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय सचिव पंकजाताई साहेब मुंडे यांना मोठ्या मताधिक्याने लोकसभेत पाठवण्यासाठी प्रयत्नांची परकाष्टा करावी असे आवाहनही त्यांनी शेवटी केले. यावेळी धामणगाव येथे माजी सभापती छत्रगुण मरकड,संजय गाढवे, विस्तारक हरिष खाडे,माजी सरपंच अशोक गर्जे,एन.टी. गर्जे, डॉ.युवराज तरटे,सरपंच नंदकिशोर करांडे,शहादेव वणवे,संपत ढोबळे, धनंजय तरटे,कल्याण काकडे,सरपंच मनोज गाढवे,सुंदरलाल गर्जे तर आष्टी येथील बैठकीस युवानेते जयदत्त धस,आदिनाथ सानप,अरुण भैय्या निकाळजे, विस्तारक हरिष खाडे,गणेश शिंदे,रंगनाथ धोंडे,आत्माराम फुंदे,खंडू जाधव लोखंडे मामा,सरपंच सुधीर पठाडे,सरपंच अशोक मुळे,शांतीलाल भोसले,दीपक निकाळजे, अशोक पवार,किशोर झरेकर मनोज सुरवसे रीजवान सय्यद शफीक शेख सादीक कुरेशी बबबुभाई आतार शम्भु भाई,शैलेश सहस्त्रबुद्धे ज्योतिबा रेडेकर,सुनील रेडेकर, शरद रेडेकर बन्सी पोकळे,भारत मुरकुटे,सरपंच तात्यासाहेब शिंदे,संजय पोकळे,अमृत पोकळे, सचिन काकडे माजी सरपंच अतुल कोठुळे,सरपंच परिवंत गायकवाड,नवनाथ नागरगोजे,सरपंच हिराभाऊ केरुळकर, माजी सरपंच बबन शेकडे,भरत जाधव,नगरसेवक अक्षय धोंडे उपस्थित होते.

## अवैद्य देशी दारू वाहतुकीवर कारवाई

लातूर । प्रतिनिधी

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या लातूर जिल्ह्याचे अधीक्षक केशव राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य उत्पादन शुल्क लातूर विभाग कारवाई करत राज्य उत्पादन शुल्क उदगीर विभागाने कासार शिरशी ते बडूर रोडच्या कडेला तालुका निलंगा, जिल्हा लातूर येथे अवैद्य देशी दारूचे दोन बॉक्स वाहतक करणारी दुचाकी चाकी १० किलोमिटर. पाठलाग करून पकडला. सदर कारवाईत दोन देशी दारूचे बॉक्स व दुचाकी चाकी मोटरसायकल असा ६६ हजार ७२० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदर कारवाई मध्ये उपाधीक्षक एम. जी. मुपडे, भरारी पथक धाराशिव लातूर, निरीक्षक आर. एम चाटे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक गणेश गोले, विक्रम परळीकर यांनी सहभाग घेतला.

## श्री.क्षेत्र महादेवदरा येथे मंगळवार पासून हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळा

आष्टी। प्रतिनिधी

**श्री क्षेत्र महादेव मंदिर महादेवदरा संस्थान बीडसांगवी ता. आष्टी,येथे मंगळवार गुढी पाडव्या पासून हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे या सप्ताहाचे वर्ष ३१ वे आहे.**

सर्व भाविक जनता जनार्दनास कळविण्यात आनंद होत आहे की कलीच्या वाढत्या प्रभावा पासून जीवाची सुटका करणारे प्रभावी साधन म्हणजे हरीचे किर्तन ते अबालवृध्द ते तरूनांना घडावे यासाठी प्रतिवर्षाप्रमाणे होणारा अखंड हरिनाम सप्ताह याहिवर्षी ह.भ.प. कल्याण महाराज कोल्हे महादेव दरा ट्रस्ट अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली व ट्रस्ट सचिव ह.भ.प. येवले सुदाम सर यांच्या कुशल नेतृत्वामध्ये व विश्ववंदनीय साधु संताच्या कृपाशिर्वादाने मिती चैत्र शु प्रतिपदा (गुढीपाडवा) या शुभमुहूर्तावर शके १९४६ मंगळवार दि. ०९-०४-२०२४ पासुन ते मिती चैत्र शुध्द अष्टमी मंगळवार दि. १६-०४-२०२४ पर्यंत करण्याचे आयोजन केले आहे तरी सर्वच भाविकांनी या पारमार्थीक सुवर्णसोहळ्याचा अवश्य लाभ घेऊन आपले जीवन कृतार्थ करावे व्यासपीठ चालक। ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज केंद्रे, ह.भ.प. सुरज नामदेव भगत, ह.भ.प. पवार महाराज देवळालीकर ,दैनंदिन कार्यक्रम पहाटे ४ ते ६ काकडा भजन, ६ ते ७ विष्णुसहस्त्रनाम, व शिवमहिम्न, स्तोत्र, स. ७ ते ११ श्रीज्ञानेश्वरी पारायण, स. ११ ते १ तु.म. गाथा भजन, दु. १ ते २ भोजन विश्रांती. २ते ४ ज्ञानेश्वरी पारायण, ४ ते ५ प्रवचन, ५ ते ७ हारिपाठ, ७ ते ७.३० आरती, ७.३० ते ९ भोजन, रात्री ९ ते ११ हरिकिर्तन, रात्री ११ ते ४ सामुहिक हरिजागर (भजन)मंगळवार दि ०९/४/२०२४ मंगळवार दि १६.०४.२०२४ रात्री ९ ते १२ या वेळेत किर्तनसेवा ह.भ.प.संतोष महाराज मोरे (मोरेवाडीकर),ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज भवर (शेष नारायण वारकरी शिक्षण संस्थान, देसुर),ह.भ.प. उत्तम महाराज वराट (साकतकर), ह.भ.प.श्रीरंग स्वामी महाराज (कानिफनाथ गड शिरूर), ह.भ.प. शिवाजी महाराज येवले (हनुमान टेकडी, नायगांव),ह.भ.प.गु. तुळशीराम महाराज काकडे (संत श्री तुकाराम महाराज वारकरी शिक्षण संस्था, पैठण), ह.भ.प. परमेश्वर महाराज जायभाये (जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था अध्यापक, आळंदी),ह.भ.प. कल्याण महारान कोल्हे (महादेवदा संस्थान) यांचे काल्याचे किर्तन होईल व महाप्रसादाचा कार्यक्रम होईल. तरी सर्व भाविकांनी या पारमार्थीक आनंद सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन महादेव दरा बीडसांगवी ट्रस्ट तर्फे करण्यात आले आहे.

## पान १वरून...

### भारत २०२५ च्या अखेरीस युरिया

सरकारचे ध्येय स्पष्ट असून युरिया उत्पादन वाढण्यासह आयात शुन्यावर आणण्यासाठी भर दिला जात आहे. देशातील युरियाचे उत्पादन वाढून २०२५ अखेरीस आम्हाला युरियाची आयात करावी लागणार नाही. यामुळे युरिया आयातीसाठी मोजावे लागणारे पैसे वाचतील, असा दावा मांडविया यांनी केला आहे. तसेच, गेल्या १० वर्षात सरकारने कृषी क्षेत्रासाठी खतांचा पुरवठा केला असून खतांच्या किमतीत देखील दिलासा देण्याचे काम केले आहे. तसेच खतांवर सबसिडी वाढवली आहे. सरकारने २०२४-२५ साठी खत अनुदान म्हणून १.६४ लाख कोटी रुपयांची तरतूद केली आहे. सुधारित अंदाजानुसार, २०२३-२४ मध्ये खतांवर एकूण अनुदान १.८९ लाख कोटी रुपये होते. भारतीय कृषी क्षेत्राच्या सुधारणेसाठी खतांची उपलब्धता अत्यंत महत्त्वाची आहे. ६०-६५ देशातच युरियाचे उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. आता सरकारकडून नॅनो लिक्विड युरिया आणि नॅनो लिक्विड डी-अमोनियम फॉस्फोरेट (डीएपी) च्या निर्मितीसह वापराला चालना देण्यावर भर देण्यात येत आहे. यामुळे भारत पुढील वर्षाच्या अखेरीस युरियाची आयात थांबवेल, असे मांडविया म्हणाले.

---------------

### आ.प्रकाश सोळंकें यांच्या स्वीय

केली. याप्रकरणी दि.०६ एप्रिल म्हणजे दुसऱ्या दिवशी शनिवार रोजी स्वीय साह्यक महादेव भिवराव सोळंके यांच्या फिर्यादीवरून आजयसिंह दिलीप राऊत, अभय राऊत, अशोक बालासाहेब सोळंके, मेघराज अर्जुन सोळंके व इतर तीन जणांविरोधात माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दिंडे हे करत आहेत. दरम्यान, या मारहाणीचा व्हिडिओ सोशल मिडीयावर प्रचंड व्हायरल झाला आहे.

---------------

### सोयाबीन उत्पादक

करणारे राज्य आहे. केंद्र सरकारने २०२३-२४ च्या खरीप हंगामासाठी सोयाबीन पिकासाठी ४६०० रुपये प्रति क्विंटल हमीभाव निर्धारीत केला होता. मात्र खुल्या बाजारात यापेक्षा अधिक भाव मिळालाच नाही.

-------------

### दैनिक राज्य लोकतंत्रचे आदर्श शेतकरी व

शेतकरी हा केंद्रबिंदू मानून दैनिक राज्य लोकतंत्र गेल्या दोन वर्षापासून जनसेवेत कार्यरत आहे. शेतकऱ्यांच्या व्यथा शासन दरबारी मांडून त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम लोकतंत्र च्या माध्यमातून करण्यात येत आहे. याच भूमिकेतून वर्धापन दिनाच्या निमित्त गतवर्षीही आदर्श शेतकरी व सरपंच पुरस्कार देण्यात आले. पुरस्काराचे यावर्षी द्वितीय वर्ष असून जिल्ह्यातील ११ आदर्श शेतकरी आणि ११ आदर्श सरपंच यांची निवड करण्यात आली आहे. गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला दिनांक ८ एप्रिल रोजी सायंकाळी सहा वाजता बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे. पुरस्कार प्राप्त शेतकरी आणि सरपंच यांचा गुणगौरव आयुष्यमान भारत- मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे, पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस एम देशमुख, सामाजिक कार्यकर्ते गौतम खटोड, इन्फंट इंडियाचे संचालक दत्तामामा बारगजे आणि पसायदान सेवा प्रकल्पचे संचालक गोवर्धन दराडे आदी मान्यवरांच्या शुभहस्ते होणार आहे. मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन दैनिक राज्य लोकतंत्र परिवाराच्या वतीने करण्यात येत आहे.

-------------

### देशाच्या संविधानाशी

आणि निहित राजकीय हितसंबंधांपासून अधिकार वेगळे करण्यासाठी वेळोवेळी पुढे येत आहे. तथापि, आपण हे विसरता कामा नये की न्यायपालिकेचे स्वातंत्र्य आणि बारचे स्वातंत्र्य यांचा खोलवर संबंध आहे.'' ते म्हणाले की, एक संस्था म्हणून बारचे स्वातंत्र्य ''कायद्याचे राज्य आणि घटनात्मक शासनाचे रक्षण करण्यासाठी नैतिक ढाल'' म्हणून कार्य करते.

**सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर शंका घेणाऱ्यांना सल्ला**

सीजेआय म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाच्या घटनात्मक खंडपीठांचे निर्णय कठोर कृती, कसून कायदेशीर विश्लेषण आणि घटनात्मक तत्त्वांना वचनबद्धतेचे प्रतिनिधित्व करतात. ते म्हणाले, ''निवाडा सुनावल्यानंतर ती सार्वजनिक मालमत्ता बनते. एक संस्था म्हणून आमचे खांदे रुंद आहेत. आम्ही प्रशंसा आणि टीका दोन्ही स्वीकारतो. ही स्तुती आणि टीका पत्रकारितेतून असो, राजकीय भाष्य असो वा सोशल मीडिया, जर आपण काहीतरी म्हणतो, त्याचा मोठा प्रभाव पडतो. सरन्यायाधीश पुढे म्हणाले की, बार असोसिएशनचे सदस्य आणि पदाधिकारी, वकिलांनी न्यायालयाच्या निर्णयावर प्रतिक्रिया देताना सामान्य लोकांबद्दल भाष्य करू नये.

--------------

### सांगली मतदारसंघाचा

नसताना लुडबुड करू नये असे सांगत अप्रत्यक्ष विश्वसजीत कदम यांच्यावर टीका करत नाराजांचे विमान कुठे उतरते ते माहीत आहे असा खोचक टोला लगावत ते विमान गुतराजमध्ये जाऊ नये अशी टीकाही केली. त्यावर विश्वजीत कदम म्हणाले की, मला माहित नाही की संजय राऊत हे कोणाबद्दल बोलत आहेत. त्यांच्यात हिंमत असेल तर त्यांनी नाव घेऊन बोलावे, पण महाविकास आघाडीवर परिणाम होईल असे वक्तव्य करणे त्यांनी टाळावे. सांगलीत कोणालाही विचारले तर कोणीही सांगेल की सांगली हा लोकसभा मतदारसंघ काँग्रेसचा आहे. इतकेच काय इथल्या जनावरांना अर्थात शेतकऱ्यांच्या जनावरांनाही विचारले तरी ती जनावरही सांगतील असा उपरोधिक टोलाही यावेळी त्यांनी लगावला. आता एक दोन दिवसात काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, मुकूल वासनिक यांनी हा वाद मिटविणार असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे हा मतदारसंघ काँग्रेसकडेच राहतो की शिवसेना उबाठा गटाकडे जातो हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

--------------

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार, दि. ७ एप्रिल २०२४



## बनावट हरपीकची विक्री करणार्या इसमाकडून २२ हजारांचा माल जप्त; गुन्हा दाखल

**अंबाजोगाई :** हरपीक प्रॉडाक्टचा बनावट माल तयार करून त्याची सार्वजनिक ठिकाणी विक्री केल्या प्रकरणी कळंबच्या व्यापार्या विरूद्ध गुन्हा नोंद झाला आहे. त्यांच्याकडून २२ हजार २२० रूपये किंमतीचे बनावट हरपीकचे प्रॉडाक्ट ५०० नग पोलिसांनी जप्त केले आहेत. जलाल मुन्ना शेख (वय ३८), रा.बाबा नगर कळंब असे त्या आरोपीचे नाव आहे. अंबाजोगाई शहरात शासकीय विश्राम गृहाच्या परिसरात जलाल मुन्ना शेख हा हरपीकचे बनावट प्रॉडाक्ट विकत असल्याची माहिती हरपीक कंपनीचे मुख्य रईसोद्दीन फैजोद्दीन इनामदार यांना मिळाली. ही खात्री करण्यासाठी त्यांनी आपल्या दोन सहकार्यांना घेवून अंबाजोगाई पोलिस स्टेशन गाठले. तिथे पोलिसांना सोबत घेवून जलाल मुन्ना शेख याच्या जवळील विक्री करत असलेल्या मालाची पाहणी केली. यावेळी जलाल हा बनावट माल विक्री करत असल्याचे लक्षात आले. कंपनीची फसवणूक करून जलाल याने २२ हजार २२० रूपये किंमतीचे ५०५ नग त्याच्या जवळ असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी त्यास ताब्यात घेवून बनावट मालाची विक्री करत असल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पाडळसिंगी-पाचेगाव-वडवणी राज्य रस्ता कामाची केली पाहणी

## आर्थिक सुबत्तेसाठी दळणवळणाचा पर्याय महत्त्वाचा स्त्रोत -आमदार पवार

**गेवराई । प्रतिनिधी**

रस्ता, पाणी आणि वीज, या त्रिसूत्री धोरणाच्या माध्यमातून, गेवराई मतदारसंघातील लहान मोठी गावे राज्य आणि राष्ट्रीय महामार्गाला जोडल्याने ; ग्रामीण भागातील नागरीकांच्या जीवनात आर्थिक सुबत्तेसाठी पर्याय उपलब्ध होईल. त्यामुळे, येणाऱ्या काही काळात मतदारसंघातील गावे विकासाच्या बाबतीत मुख्य प्रवाहात राहतील, असा विश्वास आमदार लक्ष्मण पवार यांनी येथे व्यक्त केला आहे. शुक्रवार ता. ५ रोजी दु. दोन वाजता आमदार पवार यांनी १५० कोटी रू च्या सुरू असलेल्या, पाडळसिंगी-पाचेगाव-वडवणी रस्ता कामाची पाहणी करून, कंत्राटदार , अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

आमदार पवार यांनी सांगितले की, गेवराई-बीड राष्ट्रीय महामार्गावर पाडळसिंगी फाटा ते पाचेगाव-वडवणी क्र. २३२ राज्य रस्ता कामाला सुरुवात झाली आहे. हा राज्य रसता ३८ किलोमीटर असून, राज्य रस्त्यावर प्रमुख १३ गावे येतात. त्या शिवाय अगदी चार-पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या अनेक गावांना दळणवळणासाठी उपयोग होणार आहे. गेवराई मतदारसंघातून पुढे वडवणी कडे जाणार्या रस्त्यावर पाडळसिंगी, पाचेगाव, वाहेगाव, कुकुडगाव, गुंदा, वडगाव, दगडगाव, वाहेगाव वसंत नगर तांडा, ताडसोन्ना, केसापुरी परभणी, वडवणी गावांचा समावेश आहे. सदरील राज्य रस्त्यावर जवळपास सहा पदर अंथरण्यात येणार आहेत. कामाची पद्धत, कामाचा दर्जा प्रत्यक्ष जाऊन पाहणी करणे, माजी जबाबदारी आहे. या परिसरातल्या नागरीकांना ही, रस्ता कामावर लक्ष देण्याचे आवाहन करत असतो.





असे सांगून ,ते म्हणाले, दर्जेदार कामे अनेक वर्ष टिकतात, म्हणून लक्ष द्यावे लागते. एकदा बजेट पडले की, नंतर कितीही प्रयत्न केले तरी फायदा होत नाही. सरकार नियमानुसार बजेट टाकते, मंजुरी देते. रस्ता तयार करून घेणे आपली, गावाची, प्रशासनाची जबाबदारी निश्चित केलेली असते. त्यादृष्टीने, गेवराई मतदारसंघातल्या सुरू असलेल्या कामांना वेळेत भेटी देत असून, कुठे काय, कमी-जास्त आहे. हे पाहतोय, कुचराई, बनवाबनवी खपवून घेत नाही. घेणार नाही. हे आधीच स्पष्ट करून सांगितलेले असते. लोकांचा पैसा, लोकांच्या हितासाठी उपयोगी यायलाच हवा. या बाबतीत, कुणीही सांगितले तरी ऐकुन घेत नाही. असे ही आमदार पवार यांनी ठणकावून सांगितले. यावेळी कंत्राटदार, नागरीक, प्रा. येळापुरे यांची उपस्थिती होती.

## कुणबी प्रमाणपत्र वाटप,पाणी टंचाई आणि शेतकरी अनुदान बाबत आ.प्रकाश सोळंकेंनी घेतली आढावा बैठक

माजलगाव । प्रतिनिधी

येथील उपविभागीय अधिकारी माजलगाव कार्यालय येथे दि ०५ एप्रिल शुक्रवार रोजी कुणबी प्रमाणपत्र वाटप,पाणी टंचाई आणि शेतकरी अनुदान बाबत आ.प्रकाश सोळंके यांनी आढावा बैठक घेऊन प्रशासनाला महत्वाच्या सूचना केल्या.

या आणावा बैठकीमध्ये माजलगाव तालुक्यामधून धर्मेवाडी,गोविंदवाडी,रामनगर तांडा,राजेगाव तर वडवणी तालुक्यातील खडकी,देवळा,कान्हापुर,तिगाव या गावांमधून टँकर मंजुरीसाठी सदरचे प्रस्ताव मंजुरीस्तव उपविभागीय अधिकारी कार्यालय माजलगाव यांच्याकडे सादर करण्यात आले आहेत.प्रस्तावांना मंजुरी देऊन तातडीने टँकर





सुरू करण्याबाबत आ.प्रकाश सोळंके यांनी उपविभागीय अधिकारी यांना सूचना केली.तसेच माजलगाव उपविभागीय अधिकारी कार्यालयात कुणबी प्रमाणपत्रा बाबत ०२ एप्रिल २०२४ अखेर पर्यंत ९८५० इतके अर्ज कार्यालयीन स्तरावर प्राप्त असून त्यापैकी ५९४५ कुणबी जात प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहेत.तर प्रलंबित ३६१५ अर्जांवर तातडीने कारवाई करून कुणबी प्रमाणपत्र वितरीत करावेत.तसेच धारूर आणि वडवणी तालुका दुष्काळी म्हणून शासनाने घोषित केला आहे.दुष्काळामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने मदत जाहीर केले आहे. ती मदत अद्यापही शेतकऱ्यांपर्यंत पोहचली नाही.ती मदत पोहचण्यासाठी प्रशासकीय स्तरावर असलेल्या ऑनलाइन प्रक्रियेची पूर्तता करून ८ ते १० दिवसात शासनाकडे पाठवण्यात यावी आणि शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदान जमा करण्यात यावेत अशा सुचेना यावेळी आढावा बैठकीत आ.सोंळंके यांनी प्रशासनाला केल्या आहेत,

## मच्छिंद्रनाथांचा समाधीस्नान सोहळा सोमवारी सावरगावात होणार

**म्हसोबावाडी। प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील गर्भगिरीच्या पर्वतरांगेतील श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान सावरगाव (मायंबा) येथे नवनाथांपैकी एक असलेले मच्छिंद्रनाथांची संजीवन समाधी आहे. गुढी पाडव्याच्या फाल्गुनी अमावस्याच्या रात्री म्हणजेच सोमनार दि.८ एप्रिल रोजी दर्शनासाठी खुली करण्यात येणार आहे. वर्षभरातून फक्त एकदाच फाल्गुनी अमावस्येला संजीवनी समाधीवर भाविकांना सुगंधी चंदनलेप, चंदन उटी लेप लावण्याचा कार्यक्रम असतो नवनाथांपैकी आद्यनाथ समजल्या जाणार्या चैतन्य मच्छिंद्रनाथांची





संजीवन समाधी तालुक्यातील श्रीक्षेत्र सावरगाव (मायंबा) येथे आहे. गर्भगिरी डोंगराच्या कुशीत वसलेल्या या गावाला मोठा अध्यात्मिक वारसा लाभलेला आहे. मच्छिंद्रनाथांनी येथे संजीवन समाधी घेतलेली असून वर्षातून फक्त एकच - दिवस गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी म्हणजे फाल्गुन वद्य अमावास्येला रात्री या समाधीवरील भरजरी भगवे वस्त्र बाजूला काढून ५ समाधीला मंगलस्नान घालून महापूजा केली जाते. यंदा सोमवार दि ८ एप्रिल रोजी सर्यास्त ते गढीपाडव्याच्या सूर्योदयापर्यंत हा सोहळा चालणार आहे. यानिमित्त देशभरातून लाखो भाविक दर्शनासाठी गर्दी करतात. सोमवारी सूर्यास्तानंतर रात्री नऊ वाजता भाविकांनी पैठण येथून आणलेल्या गंगाजलाने समाधीस जलाभिषेक घालण्यात येईल. प्रत्येक भाविकाला समाधीस्नान घालण्याची संधी मिळते. कावडी स्नानानंतर विविध प्रकारच्या दुर्मिळ सुगंधी द्रव्यांनी समाधीवर उटणे, लेप लावले जाते. हा सोहळा मशालीच्या उजेडात चालतो. तसेच समाधीला स्पर्श करण्यासाठी भाविकांना स्नान करून ओल्या वस्त्रानिशी येणे बंधनकारक असते. वर्षातून एकदाच होणाया या सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन देवस्थान समितीचे अध्यक्ष, सचिव, सर्व विश्वस्त व सावरगाव येथील ग्रामस्थांनी केले आहे.

## लेफ्टनंट अभिषेक कुलकर्णी यांचा मुडेगावकरांडून सत्कार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील मुडेगाव येथील ग्रामस्थांच्या वतीने लेफ्टनंट अभिषेक कुलकर्णी यांचा आर्मी एअर अकॅडमी कानपूर येथे नियुक्ती झाल्याबद्दल शुक्रवारी सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी मुडेगाव येथील पोलीस पाटील लक्ष्मण बापू जगताप कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते .तसेच प्रमुख पाहुणे म्हणून बालासाहेब विभुते उपस्थित होते. प्रथम लेफ्टनंट अभिषेक कुलकर्णी यांचा शाल ,श्रीफळ,आणि पुष्पहार सत्कार करण्यात आला. यावेळी शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनी यांना अभिषेक कुलकर्णी सविस्तर असं मार्गदर्शन केलं .या वेळी



अभिषेकचे वडील उपेंद्र कुलकर्णी ,आई सौ संगीता कुलकर्णी आणि काका मधुसूदन कुलकर्णी यांचाही सत्कार करण्यात आला. जिद्द चिकाटी आणि अभ्यास करून विद्यार्थ्यांनी मैदानातील सर्व खेळ खेळणे आवश्यक आहे असे मार्गदर्शनपर भाषणात अभिषेक यांनी विद्यार्थ्यांना सल्ला दिला.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य सर्वश्री रंगनाथ शाहू जगताप, विद्याधर जगताप, ज्ञानोबा करंजकर ,तसेच गावकरी आणि शालेय विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री चव्हाण अर्जुन पोमा यांनी केले तर आभार श्री रंगनाथ शाहू जगताप यांनी मानले.

## रमजान ईद व आंबेडकर जयंती निमित्त विद्युत पुरवठा सुरळीत करा -शेख मोसिन

**पाटोदा । प्रतिनिधी**

एकीकडे उन्हाळयामुळे ऊनाचे चटके जनतेला बसत आहे तर दुसरीकडे मुस्लिम बांधवांचा रमजान पवित्र महिना सुरू असुन पहाटे पासून सुरू होणाऱ्या प्राथनेला नगरपंचायतच्या दुर्लक्षामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. प्रामुख्याने पाटोदा शहरातील विविध भागातील अनेक पथदिवे बंद अवस्थेत असुन अनेक वेळा याकडे लक्ष वेधूनही दुर्लक्ष होत असल्याने सामाजिक कार्यकर्ते मोसिन भाऊ यांनी तात्काळ दुरुस्ती करा नसता लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असा इशारा प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.रमजान महिना आता



अंतिम टप्प्यात आला असुन नागरिकांची आता खरीदी आदी रमजान सनाची पुर्व तयारी सुरू असुन तसेच माहामानव डॉ. बाबासाहेब अंबेडकर यांची जंयतीही जवळ आली आहे.मात्र विद्युतमहामंडळाच्या गलथान कारभारामुळे सततच विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने लोकांना नाहक्क त्रास सहन करावा लागत आहे.व त्यामध्ये नगरपंचायतच्या अस्वच्छेमुळे डासांचीही संख्याही वाढल्याने लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.तरी संबंधित विभागाच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी योग्य उपाययोजना राबवून नागरीकांची होणारी पिळवणूक थांबवावी अशी मागणी शेख मोसिन (भाऊ) यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

## अण्णासाहेब मोरे यांचा अभिष्टचिंतन सोहळा विविध उपक्रमांनी साजरा

**जि.प.शाळेतील ५०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व अनाथ आश्रमातील मुलांना भोजनाची व्यवस्था**

माजलगाव । प्रतिनिधी

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुकुल त्रंबकेश्वर नाशिकचे पिठाधीश परमपूज्य गुरुमाऊली श्री अण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त दि ०५ एप्रिल शुक्रवार रोजी तालुक्यातील जि.प शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप तसेच अनाथ आश्रमातील बालकांना भोजन अशा विविध उपक्रमातून वाढदिवस साजरा करण्यात आला.

परमपूज्य गुरुमाऊलींच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त समर्थ परिवाराच्या वतीने दि ०५





एप्रिल शुक्रवार रोजी माजलगाव तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा शिंपेटाकळी व घळाटवाडी येथील शिकणाऱ्या जवळपास ५०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच पसायदान सेवा प्रकल्प येथील अनाथ बालकांना अन्नदान करून परमपूज्य गुरुमाऊलींचा अभिष्टचिंतन सोहळा साजरा करण्यात आला.

हा परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे अभिष्टचिंतन सोहळा यशस्वी करण्यासाठी माजलगाव येथील समर्थ मित्र परिवाराचे रामराजे रांजवण,विशाल देवकते,गणेश काटकर,किशोर सरोदे,इद्रजित शेलार,छत्रभुज देशमुख,काशीनाथ काटकर,दत्तात्रय होके,निलेश काटकर,आदी स्वामी भक्तांनी परिश्रम घेतले.



### जाहीरनामा

धारुर येथील श्री.आर.व्ही. कदम दिवाणी न्यायाधीश, क.स्तर धारुर किरकोळ दिवाणी अर्ज क्र.११० / २०२४

जोतीराम वगैरे वि निरंक नि.१०/ड

मयताचे नाव : मयत अ.कं.१. बाळा पिता दगडू लांब अ.कं.२. सरुबाई भ्र.बाळा लांब दोघे रा.चिंचपुर ता.धारुर जि.बीड हे अ.कं. १. दिनांक २४/०६/२०२० व अ.कं. २. दिनांक १८/१२/२०१८ रोजी मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारस अर्जदार कं. १. जोतीराम पिता बाळा लांब वय ५८ वर्षे धंदा-शेती रा.चिंचपुर ता.धारुर जि.बीड २. हरिभाउ पिता बाळा लांब वय-५५ वर्षे धंदा-शेती रा.चिंचपुर ता.धारुर जि.बीड ३. दादाराव पिता बाळा लांब वय-५० वर्षे धंदा-शेती रा.चिंचपुर ता.धारुर जि.बीड यांनी या न्यायालयास मयत अ.क्र. १. बाळा पिता दगडू लांब अ.कं.२. सरुबाई भ्र.बाळा लांब दोघे रा.चिंचपुर ता.धारुर जि.बीड हे मयत असून त्यांच्या पश्चात अर्जदारांना मयताच्या नावावरील मयत नामे अ.कं. १. बाळा पिता दगडू लांब यांच्या नावाने दि.बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बैंक लि.बीड शाखा धारुर ता.धारुर जि.बीड येथील खाते क्रमांक ००१५११००२००१५११ मध्ये रक्कम रुपये ३२०८८/- रुपये व अ.कं.२. सरुबाई भ्र.बाळा लांब रा.चिंचपुर ता.धारुर जि.बीड यांच्या नावाने दि.बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.बीड शाखा धारुर ता.धारुर जि.बीड येथील खाते क्रमांक ००१५११००२०१२३१३ मध्ये रक्कम रुपये ३७४४९/- रुपये त्यावरील व्याज बँकेतुन उचलण्यासाठी, अर्जदार यांना

वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा अर्जदार सदरहु अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत अ.कं. १. बाळा पिता दगडू लांब अ.कं.२. सरुबाई भ्र.बाळा लांब दोघे रा.चिंचपुर ता.धारुर जि.बीड यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०४/०४/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख : ०७/०५/२०२३

आदेशावरून

स्वाक्षरीत/- स्वाक्षरीत/-
शेख क्यु.एस क. सहा.अधिक्षक
लिपिक दिवाणी न्यायालय क.स्तर धारूर

### जाहीरनामा

धारुर येथील श्री. आर. व्ही. कदम दिवाणी न्यायाधीश, क.स्तर धारुर किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८६/२०२४

विठाबाई वगैरे वि निरंक नि.७/ड

मयताचे नाव मयत अभिमान पिता बापूराव लाखे रा. खोडस ता.धारुर जि.बीड हे दिनांक ३०/०७/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. आणि त्यांचे वारस अर्जदार १. विठाबाई भ्र.अभिमान लाखे वय-७० वर्षे धंदा-घरकाम राखोडस ता.धारुर जि.बीड २. महारुद्र पिता अभिमान लाखे वय-४९ वर्षे धंदा-शेती रा.खोडस ता.धारुर जि.बीड ३. यशोदा भ्र.शाहूराव हंडीबाग वय-५५ वर्षे धंदा-घरकाम रा. आणेगांव ता.केज जि.बीड ४. लता भ्र.नवनाथ शिंदे वय ४२ वर्षे धंदा-घरकाम रा. होळ ता.केज जि.बीड ५. मंगल भ्र.नवनाथ सिरसट वय-४० वर्षे धंदा-घरकाम रा. भावठाण ता.अंबाजोगाई जि.बीड ६. सुमन भ्र.प्रवीण शिनगारे वय ३८ वर्षे धंदा-घरकाम रा.धारुर ता.धारुर जि.बीड यांनी या न्यायालयास अभिमान पिता बापूराव लाखे रा.खोडस ता.धारुर जि.बीड हे मयत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदारांना शासकीय योजनेचा लाभ घेण्या करीता, व इतर महत्त्वाच्या कामकाजा करीता, अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत अभिमान पिता बापूराव लाखे रा. खोडस ता.धारुर जि.बीड हे यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १९/०३/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पुढील तारीख २४/०४/२०२४

आदेशावरून
स्वाक्षरीत/-

स्वाक्षरीत/- सहा.अधिक्षक
शेख क्यु.एस क. (श्री.बी.जी.चाटे)
लिपिक दिवाणी न्यायालय क.स्तर धारूर

### जाहीरनामा

घारुर येथील श्री. आर. व्ही. कदम दिवाणी न्यायाधीश, क स्तर धारुर किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ११७/२०२४

मंगल वगैरे वि निरंक नि ७/ड

मयताचे नाव मयत आत्माराम पिता साहेबराव गडदे रा.मोरफळी ताधारुर जिबीड है दिनांक ११/०८/२०२३ रोजी मयत झालेले आहेत आणि त्यांचे वारस अर्जदार १. मंगल भ्र. आत्माराम गडदे वय ६० वर्षे धंदा-घरकाम रा.मोरफळी ता.धारुर जिबीड २. नवनाथ पिता आत्माराम गडदे वय-३६ वर्षे धंदा-शेती रा.मोरफळी ता.धारुर जि.बीड ह.मु. सुरेवाडी औरगाबाद ता.जि. औरगाबाद ३. रघुनाथ पिता आत्माराम गडदे वय ३६ वर्षे घदा शेती रा. मोरफळी ता.धारुर जि.बीड यांनी या न्यायालयास आत्माराम पिता साहेबराव गडदे रा.मोरफळी ता.धारुर जि.बीड हे मयत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदाराना शासकीय योजनेचा लाभ घेण्या करीता, व इतर महत्त्वाच्या कामकाजा करीता, अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत आत्माराम पिता साहेबराव गडदे रा. मोरफळी ता.धारुर जि.बीड याचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०६/०४/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले पुढील तारीख ०८/०५/२०२४

आदेशावरून

स्वाक्षरीत/- स्वाक्षरीत/-
शेख क्यु.एस क. सहा.अधिक्षक
लिपिक दिवाणी न्यायालय क.स्तर धारूर

### जाहीरनामा

धारूर येथील श्री आर की कदन दिवाणी न्यायाधीश, क.स्तर धारुर किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२०/२०२४

गवळणबाई वगैरे वि निरक नि ७/२

मयताचे नाव मयत सुखदेव पिता लिंबाजी तरकसे रा.आसरडोह ता.धारूर जि.बीड हे दिनांक ३०/०३/२०२४ राजी मयत झालेले आहेत आणि त्यांचे वारस अर्जदार गवळणबाई सुखदेव तरकसे वय ६५ वर्षे धंदा-घरकाम रा आसरडोह ताधारुर जिबीड २. दधानंद पिता सुखदेव तरकसे वय-३२ धंदा मजुरी आसरडोह ता.धारुर जि.बीड ३ विद्यानंद पिता सुखदेव तरकसे वय-३० वर्ष धंदा-मजुरी रा.आसरडोह ता.धारुर जि.बीड यांनी या न्यायालयास सुखदेव पिता लिबाजी तरकसे रा आसरडोह ता.धारुर जि.बीड हे मयत झाले असून त्यांच्या पश्चात अर्जदारांना शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरीता व इतर महत्वाच्या कामकाजा करीता अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज वा न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती नः दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहु अर्जदार हयाचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत सुखदेव पिता लिबाजी तरकसे रा.आसरडोह ता.धारुर जि.बीड याचे वारसाला वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०६/०४/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारीख ०८/०५/२०२४

आदेशावरून


स्वाक्षरीत/- स्वाक्षरीत/-
शेख क्यु.एस क. सहा.अधिक्षक
लिपिक दिवाणी न्यायालय क.स्तर धारूर


cmyk

# राज्यात इथेनॉल निर्मितीत मोठी घट; यंदा केवळ ३७ कोटी लिटर उत्पादन!

**पुणे । प्रतिनिधी**

**मागील काही वर्षांमध्ये महाराष्ट्रासह देशात इथेनॉल उद्योग चांगलाच बहरला आहे. इथेनॉल उद्योगामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देखील त्यांच्या उसाला योग्य दर मिळण्यास मोठा फायदा झाला आहे. अशातच आता चालू ऊस गाळप हंगामात राज्यात इथेनॉल निर्मितीत मोठी घट झाल्याचे समोर आले आहे. प्रामुख्याने डिसेंबर महिन्यात केंद्र सरकारने उसापासून इथेनॉल निर्मिती करण्यास बंदी घातल्याने, राज्यातील साखर उत्पादनात वाढ नोंदवली गेली.**



अधिकृत आकडेवारीनुसार, २०२३-२४ च्या चालू गाळप हंगामात राज्यात आतापर्यंत ३७ कोटी लिटर इतके इथेनॉल उत्पादन नोंदवले गेले आहे. जे मागील वर्षीच्या २०२२-२३ च्या हंगामात १०३ कोटी लीटर इतके नोंदवले गेले होते. परिणामी, यंदाच्या गाळप हंगामात मागील वर्षीच्या तुलनेत ६६ कोटी लिटर इतकी इथेनॉल निर्मिती कमी नोंदवली गेली आहे. अर्थात यंदा राज्याला केवळ एक तृतीयांश इथेनॉलचे उत्पादन करण्यात यश मिळाले आहे. महाराष्ट्र हे ऊस उत्पादनातील आघाडीवरील राज्य असून, राज्यात इथेनॉल निर्मिती करणारे एकूण १३६ प्रकल्प आहेत. यामध्ये राज्यात ४६ सहकारी साखर कारखान्यांनी तर ५० खासगी साखर कारखान्यांनी आपले इथेनॉलचे प्रकल्प उभारले आहेत. तर उर्वरित ४० प्रकल्प स्वतंत्ररित्या उभारण्यात आले आहे. राज्यातील या सर्व १३६ प्रकल्पांमध्ये ३१५ कोटी लीटर इतकी विक्रमी इथेनॉल निर्मिती करण्याची क्षमता आहे. केंद्र सरकारने डिसेंबर महिन्यात इथेनॉल बंदीचा निर्णय घेतला. ज्यामुळे राज्यातील ऊस साखर निर्मितीकडे वळता झाला. मात्र, यंदा एल-निनोमुळे ऊस उत्पादनाला मोठा फटका बसला आहे. यावर्षी अगदी जून महिन्यापासूनच पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिले. जुलै महिन्यात समाधानकारक पाऊस झाला. मात्र, पुन्हा एक महिना पावसाचा खंड पडला. ज्यामुळे ऐन वाढीच्या अवस्थेत उसाला फटका. त्यानंतर सप्टेंबर महिन्यात पावसाने चांगली साथ दिली. मात्र, ऑक्टोबर महिन्यात मॉन्सूनचा पाऊस माघारी फिरला. धरणे मात्र रिकामीच ठेवून गेला. परिणामी, यंदा संपूर्ण हंगामात ऊस पिकाला शेतकऱ्यांना मोठ्या मुश्किलीने पाणी पुरवावे लागले.

## उन्हाळ्यात जनावरांमध्ये होणारा हिटस्ट्रोक आणि उपाययोजना

शेतकरी बांधवांनो पशुपालन करणे हे फार जिकरीचे काम असते. तिन्ही ऋतूमध्ये जनावरांची काळजी घेणे आवश्यक असते. आता कडक उन्हाळा सुरू झाला आहे या दिवसात पशुधनाची काळजी घेणे आवश्यक असते. अति उष्णतेमुळे जनावरांनासुद्धा उन्हाळ्यात रक्तस्राव होत असतो. हा रक्तस्राव संकरित जनावरांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येतो. यामध्ये जनावरांच्या नाकातून लाल-गडद रंगाचे रक्त वाहते.

अशा जनावरांना उपाय म्हणून त्यांच्या डोक्यावर थंड पाणी ओतावे. जनावरांना भरपूर थंड पाणी पिण्यास द्यावे.उन्हाळ्यात हिरव्या वैरणीची टंचाई, पिण्याच्या पाण्याची टंचाई असे अनेक प्रश्न निर्माण होतात आणि मुकी जनावरे ही या समस्येला सतत तोंड देत असतात. अशा परिस्थितीत जनावरांना अनेक आजार होण्याची शक्यता असते. हे आजार झाल्यास काय उपाय करावे व आजार होऊ नये म्हणून कोणती काळजी घ्यावी याबाबत सविस्तर माहिती घेणे आवश्यक आहे.

**नाकातील रक्तस्राव :**

अति उष्णतेमुळे माणसांप्रमाणेच जनावरांनासुद्धा उन्हाळ्यात रक्तस्राव होत असतो. हा रक्तस्राव संकरित जनावरांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येतो. यामध्ये जनावरांच्या नाकातून लाल-गडद रंगाचे रक्त वाहते. अशा जनावरांना उपाय म्हणून त्यांच्या डोक्यावर थंड पाणी घालावे. जनावरांना भरपूर थंड पाणी पिण्यास द्यावे. हिरवा चारा द्यावा. जनावरे झाडाखाली किंवा गोठ्यात बांधावीत. रक्तस्राव थांबत नसेल, तर पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने जनावरांना जीवनसत्त्व ''क आहारातून किंवा औषधाच्या माध्यमातून द्यावे.

**विषबाधा :**

उन्हाळ्यात हिरव्या वैरणीच्या कमतरतेमुळे जनावरे मिळतील त्या हिरव्या वनस्पती खात असतात, यामुळे विषारी वनस्पती बेशर्म, घाणेरी, गुंज, धोतरा खाण्यात येतात व जनावरांना विषबाधा होते. जनावरे गुंगल्यासारखी करतात, खात नाहीत, खाली बसतात व उठत नाहीत. त्यानंतर पाय सोडून ताबडतोब मरतात. विषबाधेची लक्षणे दिसताच पशुतज्ज्ञांच्या सल्ल्याने उपाय करावेत.

**उष्माघात :**

हा आजार अतिप्रखर सूर्याच्या किरणांमुळे व पिण्याच्या पाण्याच्या कमतरतेमुळे होतो.



उष्माघातामुळे जनावरांच्या शरीराची कातडी कोरडी पडते, जनावरे थकल्यासारखी होतात, भूक मंदावते, दूध देणे कमी होते. यावर उपाय म्हणून जनावरांच्या अंगावर थंड पाणी ओतावे किंवा ओले कापड किंवा गोणपाट जनावरांच्या डोक्यावर ठेवावे व त्यावर वारंवार पाणी मारावे. अशा जनावरांना झाडाखाली किंवा गोठ्यात बांधावे. भरपूर प्रमाणात स्वच्छ थंड पाणी व चारा द्यावा. शक्य असल्यास पाण्यात मीठ व साखर टाकावी.

**कडव्या :**


हा आजार अति प्रखर सूर्यप्रकाशामुळे जनावरांच्या कातडीला होतो. हा आजार प्रामुख्याने ज्या जनावरांच्या चामडीचा रंग पांढरा असतो, त्या जनावरांत याचा प्रादुर्भाव जास्त दिसतो; कारण पांढरा रंग असणाऱ्या जनावरांच्या कातडीत (चामडीत) ''मेलेनीन नावाचा घटक कमी प्रमाणात असतो; तसेच चाऱ्याच्या अभावामुळे भुकेपोटी जनावरे गाजर (काँग्रेस) गवत खात असतात आणि अशी जनावरे सूर्यप्रकाशात अधिक वेळ राहिली असता हा आजार होतो. या गवतातील विषारी घटक व सूर्यप्रकाशाचा परिणाम कातडीवर दिसून येतो. उपाय म्हणून जनावरांना सावलीत बांधावे. भरपूर प्रमाणात थंड पाणी द्यावे. उपचारासाठी पशुवैद्यकाचे मार्गदर्शन घ्यावे.

**कॅल्शिअमची कमतरता :**

उन्हाळ्यामध्ये हिरव्या चाऱ्याअभावी शेतकरी जनावरांना उसाचे वाढे खाऊ घालतात. वाढे जास्त प्रमाणात खाल्ल्यामुळे वाढ्यामधील ऑक्झेलेट खनिज व जनावरांच्या शरीरातील कॅल्शिअम एकत्र होऊन लघवीवाटे निघून जाते, त्यामुळे कॅल्शिअमची पातळी कमी होते. त्यामुळे जनावरांना ''मिल्क फिव्हर'' नावाचा रोग होतो, त्यामुळे जनावरे थकून एकदम खाली बसतात. शरीराचे तापमान कमी होते, रवंथ बंद होते, जनावरे खात नाहीत, दूध देणे कमी होते, शरीर थंड पडते, जनावरे मान टाकून बसतात. यावर तातडीने पशुवैद्यकाकडून उपचार सुरू करावेत

## उन्हाळ्यात कांदा पिकाचे व्यवस्थापन

भारतीय शेती ही पावसाच्या पाण्यावर आधारित आहे. मात्र ज्या शेतकऱ्यांकडे उन्हाळ्यात मुबलक पाण्याची व्यवस्था असते असे शेतकरी उन्हाळ्यात देखील शेती करत असतात. उन्हाळ्यात भारतात बहुतांश शेतकरी कांद्याची लागवड करत असतात. महाराष्ट्रात कांद्याची शेती ही सर्वाधिक बघायला मिळते. उन्हाळी हंगामात देखील मोठ्या प्रमाणात आपल्या राज्यात कांदा लागवड केली जाते. मात्र उन्हाळी हंगामात लावल्या गेलेल्या कांदा पिकाची विशेष काळजी घ्यावी लागते.



जानेवारी ते फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात लागवड केलेले कांद्याचे पीक एप्रिलच्या अखेरीस काढणीसाठी तयार होत असते. एप्रिल महिन्यात कांद्याची पाने पूर्णपणे सुकतात आणि चांगला सुकलेला कांदा जास्त काळ साठवला जातो.

**उन्हाळी कांदा पिकासाठी पाणी व्यवस्थापन**

कांदा पिकासाठी जमिनीचा प्रकार, पिकाची अवस्था आणि हंगाम या गोष्टी बघून पाणी व्यवस्थापन करावे लागते. उन्हाळी हंगामातील कांदा लागवडीनंतर लगेचच हलके पाणी द्यावे लागते आणि दर २-३ दिवसांनी हलके पाणी या पिकाला द्यावे लागते जेणेकरून माती ओलसर राहते आणि कांदा पीक चांगले वाढते आणि उत्पादन देखील चांगले येते. कांदा पिकासाठी १०-१२ वेळा पाणी देण पुरेसे असते. कांदा चांगला पोसण्याच्या वेळी पाण्याची कमतरता भासायला नको. मात्र जास्त पाणी दिल्याने कांद्याला जांभळा डाग रोग होण्याची शक्यता असते, तर शेत जास्त काळ कोरडे राहिल्यास कांदा फुटण्याची समस्या उद्भवू शकते. मात्र कांदा काढणीच्या १५ दिवस आधी पाणी देणे बंद करावे.

**तण नियंत्रण :**

कांद्याचे पीक तणमुक्त ठेवण्यासाठी वेळोवेळी निंदनी, खुरपणी करणे अतिशय महत्त्वाचे असते. याशिवाय कांदा लावणीनंतर २-३ दिवसांनी स्टॅम्प ३० ईसी सारख्या तणनाशकाची तीन लिटर प्रति हेक्टर हे प्रमाण घेऊन फवारणी करावी. उभ्या पिकामध्ये, अरुंद पानांचे अधिक अमृत गवत असेल तर क्वेझालोफॉप इथाइल ५ ईसी ४०० मिली/हेक्टर दराने फवारणी करण्याचा सल्ला दिला जातो. कांद्याची काढणी ५०% झाडांची पाने पिवळी पडून कोमेजली का मग करावी. कांदा लवकर किंवा उशिरा काढणी केल्यास कांदाच्या साठवण क्षमतेवर विपरीत परिणाम होतो. उन्हाळी हंगामातील कांद्याचे उत्पादन सरासरी २५०-३०० क्विंटल/हेक्टर होत असल्याचे कृषी तज्ज्ञ सांगत असतात.


**कांदा पिकावर येणारे रोग आणि नियंत्रण :**

थ्रिप्स - हे कीटक पानांचा रस शोषून घेतात, त्यामुळे पानांवर चांदीसारखे चमकदार पट्टे किंवा तपकिरी डाग तयार होतात. हे अगदी लहान पिवळे किंवा पांढरे रंगाचे कीटक असतात जे प्रामुख्याने पानांच्या तळाशी किंवा पानांच्या मध्यभागी फिरतात. त्याच्या नियंत्रणासाठी, निंबोळी तेलावर आधारित कीटकनाशके किंवा इमिडाक्लोप्री कीटकनाशक १७.८ एसएल फवारणी करा. औषधाचा डोस १२५ एमएल. हेक्टर एवढा असावा. ५००-६०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

माइट - या किडीच्या प्रादुर्भावामुळे पानांवर ठिपके तयार होतात व कांदे छोटे राहतात पोसले जात नाहीत. याच्या नियंत्रणासाठी ०.०५: डायमेथोएट औषध फवारणी करण्याचा सल्ला दिला जातो. जांभळा डाग/पर्पल ब्लॉच - पर्पल स्पॉट हा एक बुरशीजन्य रोग आहे, या रोगाचा प्रादुर्भाव दोन स्थितीत जास्त होतो, पहिली अतिवृष्टीमुळे, दुसरी झाडे जवळ लावल्याने, पानांवर जांभळे ठिपके तयार होतात. त्यामुळे झाडांच्या वाढीवर आणि विकासावर विपरीत परिणाम होतो. लक्षणे दिसल्यास १० दिवसांच्या अंतराने मॅन्कोझेब (२.५ ग्रॅम/लिटर पाणी) फवारणी करावी. या बुरशीनाशकांमध्ये सॅनोविट, ट्रायटोन किंवा ऑर्डिनरी गम सारखी चिकटद्रव्ये जोडणे आवश्यक आहे जेणेकरून प्रभावी नियंत्रणासाठी द्रावण पानांना चिकटू शकेल.

## पीएम किसान मानधन योजना; महिन्याला ५५ रुपये जमा करा, ३००० रुपये पेन्शन मिळवा!

**केंद्र सरकार शेतकर्यांसाठी वेगवेगळ्या योजना राबवत आहे. यातीलच एक योजना आहे 'पीएम किसान मानधन योजना' या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना दरमहा फक्त ५५ रुपये भरायचे आहेत. वयाची ६० वर्ष पूर्ण झाल्यानंतर त्याला ३००० रुपये पेन्शन म्हणून मिळतील. सामान्य लोकांना, शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ देणे हाच या योजनांचा उद्देश आहे. २ हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी जमीन असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही योजना असून अल्पभूधारक शेतकरी या योजनेचा लाभ सहज घेऊ शकतात.**



पीएम किसान मानधन योजना ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत उत्तम अशी योजना आहे. वयाची ६० वर्ष झाल्यानंतर अनेक शेतकरी शेती करण्यास सक्षम राहत नाहीत, त्यामुळे त्यांना इतरांवर अवलंबून राहावे लागते. अशा स्थितीत शेतकऱ्यांना कोणावरही अवलंबून न राहण्यासाठी शेतकऱ्यांसाठी ही योजना महत्वाची आहे. या योजनेत शेतकऱ्यांना महिना ३००० रुपयांची पेन्शन दिली जाते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी नेमकी प्रक्रिया काय? याबाबतची सविस्तर माहिती जाणून घ्या.

**५५ रुपयापासून २०० रुपयांपर्यंत प्रीमियम :**

केंद्र सरकारने २०१९ मध्ये अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री किसान मानधन योजना सुरु केली होती. अल्पभूधारक शेतकऱ्यांना आर्थिक मिळावा हाच या योजनेच्या मागचा उद्देश होता. १८ ते ४० वयोगटातील शेतकरी या योजनेचा लाभ घेऊ शकतात. वेगवेगळ्या वयाच्या टप्प्यानुसार तुम्हाला या योजनेत प्रिमीयम भरावे लागतात. ज्याची किंमत ५५ रुपयापासून २०० रुपयांपर्यंत आहे. त्यानंतर वयाची ६० वर्ष पूर्ण झाल्यानंतर तुम्हाला महिना ३००० रुपयांची पेन्शन मिळते. दरम्यान, कोणत्याही कारणाने संबंधीत शेतकऱ्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या पत्नीला निम्मी पेन्शन म्हणजे १५०० रुपये मिळतात.

**आवश्यक कागदपत्रे :**

आधारकार्ड, मोबाईल क्रमांक, पासपोर्ट साईज फोटो, ओळखपत्र, वयाचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, बँक खाते पासबुक.

**कसा घ्यायचा योजनेचा लाभ?**

या योजनेचा लाभ घेण्यासाठी https://labour.gov.in/pmsym या वेबसाईटला भेट द्या. या साईटवर लॉग इन केल्यानंतर तुम्हाला आवश्यक ती सर्व माहिती भरावी लागेल. त्यानंतर तुम्हाला ओटीपी जनरेट करावा लागेल. ओटीपी टाकून झाल्यावर अर्ज सबमीट करावा. यानंतर तुमची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होईल.





### जागतिक दिन
### जागतिक आरोग्य दिन

### महत्वाच्या घटना

१८७५ : आर्य समाजाची स्थापना झाली.
१८२७ : जॉन वॉकर या इंग्लिश रसायनशास्त्रज्ञ्याने आपली पहिली घर्षण काडेपेटी विकली. त्याने आदल्या वर्षी हिचा शोध लावला होता.
१९०६ : माऊंट व्हेसुव्हियस या ज्वालामुखीचा उद्रेक होऊन नेपल्स शहर बेचिराख झाले.
१९३९ : दुसरे महायुद्ध - इटालीने अल्बेनिया पादाक्रांत केले.
१९४० : पोस्टाचे तिकीट निघणारे बुकर टी. वॉशिंग्टन हे पहिले कृष्णवर्णीय अमेरिकन ठरले.
१९४८ : जागतिक स्तरावर स्वास्थ्य आणि आरोग्याचं संवर्धन करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे जागतिक आरोग्य संघटनेची स्थापना झाली. व्यक्तिगत आणि सामाजिक आरोग्याची लोकांना जाणीव करुन देण्यासाठी हा दिवस 'जागतिक आरोग्य दिन' म्हणून साजरा केला जातो.
१९६२ : इंटरनेट प्रणाली सक्रीय करण्यात आली.
१९६४ : आय.बी.एम. तर्फे सिस्टम/३६० (/३६०) ची घोषणा.
१९८९ : दा येथे १२८ जणांचा बळी गेला. विषारी दारुच्या बळींची ही मोठी दुर्घटना होती.
१९९६ : सिंगर करंडक क्रिकेट स्पर्धेत श्रीलंकेचा फलंदाज सनत जयसूर्या याने केवळ १७ चेंडुत अर्धशतक झळकावण्याचावि विश्व विक्रम केला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५०६ : सेंट फ्रान्सिस झेविअर - ख्रिस्ती धर्मप्रसारक. यांनी भारत व जपानमधे हजारो लोकांना ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली. गोव्यातील 'ओल्ड चर्च'मधे यांचेच शव अजून जपून ठेवण्यात आले आहे. (मृत्यू: ३ डिसेंबर १५५२ साओ जोआओ, चीन)
१७७० : विल्यम वर्डस्वर्थ - काव्यातील स्वच्छंदतावादाचे प्रणेते इंग्लिश कवी. त्यांची 'डॅफोडिल्स' ही अतिशय गाजलेली कविता आहे. (मृत्यू: २३ एप्रिल १८५०)
१८६० : विल केलॉग - 'केलॉग्ज' चा मालक (मृत्यू: ६ आक्टोबर १९५१)
१८९१ : सर डेविड लो - जगप्रसिद्ध व्यंगचित्रकार (मृत्यू: १९ सप्टेंबर १९६३ लंडन, इंग्लंड)
१९१९ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय कवी, कादंबरीकार, नाटककार आणि उर्दू साहित्याचे लघुकथा लेखक कश्मीरी लाल जाकिर यांचा जन्मदिन.
१९२० : पंडित रविशंकर, भारताचे प्रसिध्द सतारवादक.
१९२५ : चतुरानन मिश्रा - केंद्रीय कृषी मंत्री, कामगार नेते, कम्युनिस्ट पक्षाचे नेते (मृत्यू: २ जुलै २०११)
१९३८ : काशीराम राणा - भाजपाचे लोकसभा सदस्य (मृत्यू: २०१२)
१९४२ : जितेंद्र - चित्रपट अभिनेता
१९५४ : हाँग काँगचे प्रसिद्ध चित्रपट अभिनेते जॅकी चेन यांचा जन्म.
१९८२ : सोंजय दत्त - भारतीय वंशाचा अमेरिकन व्यावसायिक कुस्तीगीर.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४९८ : चार्ल्स (आठवा) - फ्रान्सचा राजा (जन्म: ३० जून १४७०)
१९३५ : डॉ. शंकर आबाजी भिसे - भारताचे 'एडिसन' (जन्म: १८६७)
१९४७ : हेन्री फोर्ड - फोर्ड मोटर कंपनीचे संस्थापक (जन्म: ३० जुलै १८६३)
१९७७ : राजा बढे - संपादक, चित्रपट अभिनेते, लेखक, नाटककार, कादंबरीकार, कथाकथनकार, गायक, कवी आणि गीतकार (जन्म: १ फेब्रुवारी १९१२)
२००१ : गोपालसमुद्रम नारायण अय्यर रामचंद्रन तथा डॉ. जी. एन. रामचंद्रन- संशोधक, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जैवभौतिक शास्त्रज्ञ . वैज्ञानिकांना मिळणारे बहुतेक सर्व राष्ट्रीय सन्मान त्यांना मिळाले. (जन्म: ८ आक्टोबर १९२२ एर्नाकुलम, केरळ)
२००४ : केलुचरण महापात्रा - प्रसिद्ध ओडिसी नर्तक (जन्म: १९२६)
२०१२ : हिंदी भाषिक कवी, लेखक व समीक्षक आचार्य जानकी वल्लभ शास्त्री यांचे निधन.
२०१४ : भारतीय हिंदी चित्रपट क्षेत्रांतील प्रसिद्ध छायाचित्रकार वेंकटाराम पंडित कृष्णमूर्ती उर्फ व्ही. के. मूर्ती यांचे निधन.

## हळदीच्या बेण्याची मागणी वाढली

पुणेः हळदीला मागील दोन हंगामापासून चांगला दर मिळत असल्याने लागवड क्षेत्रात पुन्हा वाढ होऊ लागली आहे. हळदीच्या बेण्याची मागणी वाढली. विदर्भात हजारो क्विंटल हळद बेण्याची विक्री झाली आहे. काही जणांनी परराज्यातून बेणे आणून विक्री केली. साधारणतः तीन-चार वर्षांपूर्वी हळदीला दर कमी मिळाल्याने अनेकांनी लागवड करणे सोडून दिले. याचा परिणाम क्षेत्र कमी झाले. सोबतच विविध कारणांनी हळदीच्या उत्पादनातही घट आली. गेल्या वर्षी हळद काढणीच्या वेळेस अवकाळी पावसाने थैमान घातल्यामुळे उत्पादकांचे मोठे नुकसान झाले. मागील वर्षात हळदीची लागवड कमी झाल्यामुळे व हळदीला मागणी वाढल्यामुळे या हंगामात लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल निर्माण होत आहे. आता हळदीच्या बेण्याची मागणी सर्वत्र वाढली आहे. स्थानिक शेतकऱ्यांकडे बेण्याची उपलब्धता कमी असल्याने काही जणांनी परराज्यातून हळदीचे बेणे आणून विक्री सुरू केली. आतापर्यंत चार ते पाच हजार क्विंटल बेण्याची उलाढाल या भागात झाल्याचे समजते.

# नरेंद्र मोदी पंतप्रधान आणि पंकजाताई मुंडे यांना लोकसभेत पाठवण्यासाठी सर्व प्रमुखांनी ताकदीने कामाला लागावे -आ.धस

**आष्टी । प्रतिनिधी**

जागतिक पातळीवरील नेतृत्व प्रस्थापित केलेले पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी केंद्र शासनाव्दारे आणि लोकनेते पंकजाताई साहेब मुंडे या राज्याच्या ग्रामीण विकास मंत्री असताना बीड जिल्ह्यासाठी ग्रामीण भागामध्ये दर्जेदार रस्ते पिण्याचे पाणी या सुविधांसह करोडो रुपये विविध विकास कामांवर बीड जिल्ह्यामध्ये खर्च करण्यात आले असून जिल्ह्यामध्ये विकासाची गंगा आणण्याचे सामर्थ्य केवळ पंकजाताई मुंडे यांचे मध्ये आहे त्यामुळे लोकसभा निवडणुकीमध्ये महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना विजयी करण्यासाठी सर्व प्रमुख कार्यकर्त्यांनी ताकदीने काम करावे असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी

आष्टा ह.ना.,कडा, पिंपळा लोणी,दौलावडगांव,धानोरा या पाच जिल्हा परिषद गटनिहाय विविध बैठकीमध्ये कार्यकर्त्यांची सुसंवाद साधताना केले..

यावेळी बोलताना आमदार सुरेश धस पुढे म्हणाले की केंद्र शासनाबरोबरच महाराष्ट्र राज्यातील भारतीय जनता पार्टी शिवसेना आणि मित्र पक्षांच्या महायुतीच्या सरकारच्या माध्यमातून बीड जिल्ह्यामध्ये आणि विशेषतः आष्टी विधानसभा मतदारसंघांमध्ये सर्वत्र दर्जेदार रस्त्यांची कामे सुरू आहेत.देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या जलजीवन मिशन अंतर्गत घरा-घरात पिण्याचे फिल्टर पाणी येत आहे.ग्रामीण भागात केंद्र सरकारच्या रोजगार हमी योजनांच्या माध्यमातून वैयक्तिक योजना शेततळे, जलसिंचन विहीर,गायगोठा,शेतरस्ते, पाणंद रस्ते यांचे कामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. महाराष्ट्र राज्यामध्ये पंकजाताई साहेब मुंडे या ग्रामीण विकास मंत्री असताना त्यांनी सर्व खेड्यापाड्यांमध्ये विकासाची गंगा पोहोचवलेली असून करोडो रुपयांची विकास कामे त्यांच्या काळामध्ये झालेले आहेत त्यामुळे विरोधी पक्षांकडे कोणताही विचार नसून कोणताही मुद्दा नसल्यामुळे गैरसमज पसरण्याचे काम ते करू शकतात परंतु स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते यांनी सर्वसामान्य जनतेचा कोणत्याही प्रकारचा गैरसमज होणार नाही यासाठी सुसंवाद करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या



## महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारार्थ आ.धसांचा जि.प.गटनिहाय दौरा

गोरगरिबांसाठी केलेल्या योजना आणि महाराष्ट्र राज्यातील भारतीय जनता पार्टी शिवसेना युतीच्या काळात झालेली विकास कामे याबाबत सर्वसामान्य जनतेला माहिती करून द्यावी संपूर्ण जगामध्ये आपले नेतृत्व सिद्ध केलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्वाखाली फिरसे एक बार मोदी सरकार आणि आपकी बार ४०५ अशा पद्धतीचे वातावरण संपूर्ण देशभर पसरलेले आहे त्यामध्ये आपल्या बीड लोकसभा मतदारसंघांमध्ये देखील भारतीय जनता पार्टी शिवसेना आणि मित्र पक्षांच्या महायुतीच्या उमेदवार असलेल्या पंकजाताई साहेब मुंडे यांना देखील लोकसभेत पाठवण्यासाठी सर्वांनी अत्यंत कठोर परिश्रम करून तरी कोणताही गैरसमज न करता नरेंद्रजी मोदी साहेब यांना पुन्हा पंतप्रधान म्हणून काम करण्याची संधी देण्यासाठी आपल्या लोकनेत्या पंकजा मुंडे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देऊन लोकसभेमध्ये दिल्ली येथे पाठवण्यासाठी आष्टी विधानसभा मतदारसंघातील सर्व जिल्हा परिषद गटा मध्ये बैठकांचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये आमदार सुरेश धस यांनी ठिकठिकाणी आवाहन करून गावोगावीच्या कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण करण्याचे काम या बैठकीद्वारे करण्यात आले असे सांगत गाव गावातील सर्व प्रमुख कार्यकर्त्यांनी सर्व प्रमुखांना ताकदीने कामाला लागावे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले.

बीड लोकसभा मतदारसंघाच्या भाजपा महायुतीच्या अधिकृत उमेदवार मा.पंकजा गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारार्थ शुक्रवार दि.५ रोजी आ.सुरेश धस यांच्या प्रमुख उपस्थितीत कडा जिल्हा परिषद गट,पिंपळा-लोणी जिल्हा परिषद गट या दोन्ही गटातील पदाधिकारी,गावचे प्रमुख,जि.प.सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच, ग्रा.सदस्य यासह गावातील प्रमुख मंडळीच्या बैठका घेण्यात आल्या यावेळी आ.धस बोलत होते.पुढे बोलतांना ते म्हणाले,पंकजा मुंडे यांना भाजपा महायुतीची अधिकृत उमेदवारी मिळालेली आहे.पंकजा मुंडे ह्या राज्यात ग्रामविकास मंत्री असताना वाडी म्हणू नका की तांडा तिथे कुणी कधीच निधी उपलब्ध करून दिला नाही.त्या रस्त्यांच्या कामांना त्यांनी निधी दिला.जिल्हा परिषदेच्या शाळा खोल्या,ग्रामपंचायत भवन,अंगणवाडी खोल्या,जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर केले आहेत.पंकजा मुंडे पालकमंत्री असताना आजपर्यंत कधीही न मिळालेला मोठ्या संख्येने शेतकऱ्यांना पीक विमा,अनुदान त्यांच्या प्रयत्नामुळे शक्य झाले आहे.त्यामुळे कुणी काहीही अफवा पसरवून समाजात संभ्रम निर्माण करेल.परंतू गावातील प्रमुख व प्रतिष्ठित माणूस यांनी सर्वांना समजावून सांगणे गरजेचे आहे आमदार धस यांनी शेवटी आवाहन केले आहे.

# सीओ अंधारेमॅडम गुडी पाडवा व पवित्र रमजान ईदसाठी वार्डनिहाय टँकर सुरू करावेत -नवनाथ शिराळे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

गेली अनेक वर्षापासून बीड नगरपरिषद बीड शहारातील नागरिकांना पंधरा दिवसाला एक वेळ कमी दाबाचा पाणीपुरवठा करते. बीड शहरातील नागरिक रात्री बेरात्री येणाऱ्या पाण्याचे नियोजन कसे करावे. पाणी साठवून कसे ठेवावे, शिळे पाणी कसे प्यावे. याबाबत बीड शहरातील सामान्य नागरिकांची कुचंबना होत आहे. सीओ मॅडम आपण बिसलेरीचे पाणी पीत असाल, परंतु सामान्य नागरिकांनी दूषित पाणी कसे प्यावे. लेकरा बाळांना कसे पाजावे. दूषित पाण्यामुळे अनेक नागरिक रुग्णालयामध्ये दाखल आहेत. सध्या प्रचंड उष्णता व पाणी



टंचाई असल्यामुळे नागरिकांचे पाण्याअभावी अक्षम्य हाल होत आहेत.

नगरपालिकेचे प्रशासक सीओ यांचे पाणीपुरवठ्याकडे दुर्लक्ष असल्यामुळे भर उन्हाळ्यात पिण्यास पाणी मिळत नाही. गोरगरीब जनतेला विकत पाणी घ्यावे लागते. पाणी विक्रीचा व्यवसाय करणाऱ्यांना पाणी उपलब्ध आहे. परंतु बीडकरांना पाणी पाजण्यासाठी नगरपालिका का पुढे येत नाही. गुडीपाडवा, रमजान ईद, महात्मा फुले जयंती, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती हे सर्व सन उत्सवानिमित्त विद्युत पंप दुरुस्त करावेत. लिकेज पाईपलाईन दुरुस्ती कराव्यात. मुबलक पाणीपुरवठा करावा. किंवा वार्ड निहाय टँकर सुरू करावेत अशी मागणी नगरपरिषदेचे माजी सभापती, नवनाथ शिराळे पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

# अविनाश साठे यांच्या जनसेवा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित रोजा इफ्तार कार्यक्रमास मुस्लिम बांधवांकडून भरघोस प्रतिसाद

अंबाजोगाई य प्रतिनिधी):-

अंबाजोगाई शहरातील सामाजिक युवा कार्यकर्ते, तथा फकिरा ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष तथा जनसेवा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष अविनाश साठे यांनी मुस्लिम बांधवांच्या पवित्र अशा रमजान मासानिमित्त रोजा इफ्तार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या रोजा इफ्तार कार्यक्रमास शहरातील मुस्लिम बांधवासह हिंदू बांधव देखील मोठया प्रमाणावर सहभागी झाले होते. या रोजा इफ्तार कार्यक्रमात महिलांची देखील मोठ्या प्रमाणावर उपस्तिथी दिसून आली.

जनसेवा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने शुक्रवार दि ०५ रोजी सायंकाळी दावत-ए- इफ्तारचे आयोजन करण्यात आले होते. रमजान महिना व ईद मुस्लिम बांधवांसाठी एक आपुलकीचा व जिव्हाळ्याचा सण. या रमजान महिन्यात लहान मोठे मुस्लिम बांधव हे रोजाचा उपवास करतात. हे उपवास धार्मिक भावनेसह शास्त्रीय दृष्टोकोणातून अतिशय उपयुक्त तथा अतिशय फायदेशीर ठरणारे असल्याचे मत अविनाश साठे यांनी या इफ्तार कार्यक्रमात बोलत होते. इफ्तारचे आयोजन केल्याने हिंदू मुस्लिम एकजूटीचे स्नेह जपण्याचे भाग्य मला लाभले अशी भावना देखील अविनाश साठे यांनी याप्रसंगी व्यक्त केली. या कार्यक्रमामुळे उपस्थित सर्व मुस्लिम बांधवांच्या सोबत संवाद साधता आल्याचा आनंद झाल्याचे अविनाश यांनी सांगितले.



या रोजा इफ्तार कार्यक्रमात अंबाजोगाई शहरांतील मंगळवार पेठ,गुरुवार पेठ,सिद्धार्थ नगर प्रभागामधील येवक युवा बांधवांसह ज्येष्ठ वडील धारे मुस्लिम बांधव सहभागी होऊन पवित्र कुरआन व रमजानच्या पवित्र महिन्याबद्दल बहुमोल अशी माहिती देत या महिन्याचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी परस्परातील स्नेहभाव व प्रेमळ बंधुत्व तथा एकात्मता नेहमी वृद्धिंगत होवो अशी सदिच्छा याप्रसंगी सर्वांनी व्यक्त केली. या रोज इफ्तार कार्यक्रमात महिला वर्गासाठी वेगळी व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे परिसरातील मुस्लिम महिला देखील उत्स्फूर्तपणे सहभागी असल्याचे दिसून आले.

# शाळकरी मुली बेपत्ता,महिलांवरील अत्याचार आणि आता पती-पत्नी बेपत्ता

**परळी । प्रतिनिधी**

परळी शहरातून शाळकरी मुलींचे बेपत्ता होणे महिलांवरती अत्याचार होणे या घटना मागील काही दिवसापासून घडल्या असून यामुळे महिलांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. यातच आणखी एक घटना उजेडात आली आहे सासरवाडीतून पत्नीला घेऊन जाणाऱ्या पती-पत्नी हे दोघेही बेपत्ता झाल्याची घटना समोर आली असून याप्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आला आहे

परळी शहरातील गुन्हेगारी कमी होण्याचे चिन्ह दिसून येत नसून शहरातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी शहर पोलीस ठाणे, संभाजीनगर पोलीस ठाणे

### कायदा-सुव्यवस्थेबाबत पोलीस प्रशासन अपयशी

असे दोन पोलीस ठाणे असून देखील शहरातील गुन्हेगारीचे प्रमाण वाढताना दिसून येत आहे. मोटरसायकल चोरी, हाणामाऱ्या अशा घटना नित्याचेच असताना मागील दोन दिवसापासून शहरातील दोन शाळकरी मुली बेपत्ता होणे तसेच दोन महिला वरील अत्याचार होणे या घटनांनी स्त्रियांच्या सुरक्षेतेवरील प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

यातच शुक्रवार ( दि ५ ) रोजी पती-पत्नी बेपत्ता असल्याची घटना उजेडात आली असून साटेफळ ता अंबाजोगाई येथील मजुरी व्यवसाय करणारे इम्रान नबी शेख (वय २१ ) हे आपली पत्नी रेश्मा इम्रान शेख रा.आयशा कॉलनी परळी हिला भेटण्यासाठी येवून पत्नीस दि ०२ एप्रिल रोजी घेवून जातो म्हणून घेवून गेला. मात्र त्या दिवसापासून दोघे ही पती-पत्नी अद्याप बेपत्ता असून कुटूंबियांनी त्याच्या मोबाईल वर व नातेवाईकाकडे संपर्क केला असता कसलाही ठावठिकाणा लागला नाही.

या प्रकरणी शेख इम्रान नबी याचे वडील शेख जोराबी शेख नबी यांनी परळी शहर पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दिली.

शाळकरी मुलींचे बेपत्ता होणे, महिलांवर अत्याचार होणे आशा घटना ताज्या असताना पती-पत्नी बेपत्ता होणे ही घटना उजेडात आल्याने पोलिसांच्या कार्यावर सर्व सामान्य परळीकरांची नाराजी व्यक्त करत आहे.

# डॉ.मनीषा मुंडे- चौरे डी.एन.बी. पदवी प्रदान

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील उद्योजक गोरख (बापू)मुंडे यांची कन्या डॉ. सौ.मनिषाताई मुंडे-चौरे यांनी वैद्यकीय क्षेत्रातील स्त्रीरोग व प्रसूती विषयातील महत्त्वाची समजली जाणारी डी.एन.बी पदवी परीक्षेत यश संपादन केले असून त्या उत्तीर्ण झाल्या असून त्यांच्या यशाबद्दल अंबाजोगाई शहर व परिसरातून आणि वडवणी तालुक्यातून अभिनंदन केले जात आहे.



अंबाजोगाई शहरात व्यवसायाच्या निमित्ताने दाखल झालेले गोरख (बापू)मुंडे यांनी आपल्या तीनही मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन सक्षम बनवले. उद्योजक गोरख (बापू)मुंडे यांचे मुळगाव चिखल बीड ता. वडवणी हे असले तरी त्यांनी अंबाजोगाईत आपल्या कर्तुत्वाची छाप उमटविली आहे. शिक्षणाच्या बाबतीत गोरखंबापू मुंडे व त्यांच्या अर्धांगिनी सौ. शालिनीताई मुंडे यांनी मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण देऊन त्यांना सक्षम बनवले आहे. त्यांची ज्येष्ठ कन्या डॉ .मनिषाताई मुंडे- चौरे यांनी वैद्यकीय शिक्षण घेत बारामती येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून सेवा केली. नोकरी मिळाली म्हणून त्यांनी शिक्षण थांबवले नाही .एमबीबीएसचे शिक्षण झाल्यावर त्यांनी अंतरवासीता सुरू असताना अभ्यास करुन बीड येथील शासकीय डी. जी.ओ ही पदविका प्राप्त केली. त्यानंतर पुढील शिक्षण घेत याच विषयातील पुढची व महत्त्वाची पदवी असलेली डी.एन.बी पदवीचा अभ्यासक्रम सुरू केला. दोन वर्षाचा हा अभ्यासक्रम पूर्ण करून या विषयातील पदवी परीक्षेत त्या उत्तीर्ण झाल्या आहेत. या परीक्षेचा निकाल गुरुवार दिनांक ४ एप्रिल रोजी घोषित करण्यात आला आहे.

डॉ. मनिषाताई यांच्या यशाबद्दल खा.डॉ.प्रितमताई मुंडे,माजीमंत्री पंकजाताई मुंडे ,आ. नमिताताई मुंदडा, जेष्ठ पत्रकार रामभाऊ कुलकर्णी,माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, माजी आमदार केशव दादा आंधळे, राजाभाऊ मुंडे,सोमनाथ भाऊ बडे, ओमकेश दहिफळे, बंडू गित्ते,डॉ. अनिल केंद्रे,प्रा.कमलाकर लोमटे,पत्रकार दत्तात्रय अंबेकर, हनुमंत आप्पा पोखरकर,माजी उपनगराध्यक्ष दिलीपदादा सांगळे, अंगदराव कराड, रवींद्र मोदी , इंजि. संतोष मुंडे ,पत्रकार परमेश्वर गित्ते यांच्यासह इतरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# पुर्वीच्या काळात ग्रामीण भागात पाणी साठविण्यासाठी असणाऱ्या रांजण व कोथळ्या नामशेष

## फ्रिज,प्लास्टिक टाक्या व सिमेंटच्या हौदामुळे कुंभार कारागिरांवर आली उपासमारीची वेळ

**माजलगाव । ज्योतिराम पाढंरपोटे**

आधुनिकीकरणामुळे ग्रामीण,भागातील पुर्वी असणारी कारगिर अर्थव्यवस्था बदलल्याने ग्रामीण भागातील लोहार, सुतार यांनी विविध बनविलेल्या वस्तू नामशेष होत आसुन सध्या ग्रामीण भागात सर्रास सिमेंट कांक्रीटच्या बांधकामामुळे पाणी साठविण्यासाठी प्रत्येक घरात सिमेंटचे हौद व प्लास्टिक पाण्याच्या टाक्यामुळे पुर्वी ग्रामीण भागात पाणी साठविण्यासाठी वापर होत असलेल्या रांजण व कोथळ्या नामशेष झाल्या असुन ग्रामीण भागातील कुंभार करागिरावर उपासमारीची वेळ आली आहे.



जागतिकीकरण आधुनिकीकरणामुळे ग्रामीण भागातील यापुर्वी कार्यरत असणारी अर्थव्यवस्था कोलमडली आहे, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारे औत, तिफन मोगडा, बैलगाडी हि सर्व औजारे गावातीलच सुतार बनवुन आपली उपजीविका भागवत होता तसेच औजार, औताची पास, तिफनीचे फाळ, मोगडयाचे फाळ, बैलगाडीसाठी आक व चाके हे बनविण्याचे काम लोहार कारागीर करुन आपली उपजीविका भागवत होते.तसेच ग्रामीण भागात पाणी साठविण्यासाठी कुंभार कारागीर माठ, रांजण,कोथळी बनवून विक्री करुन उपजिवीका भागवीत होते.ग्रामीण भागातील कारागिरांना गावातच काम मिळत असल्याने त्यांना गावातच रोजगार उपलब्ध होत होता. परंतु



आधूनिकीकरणामुळे, शेतीसाठी लागणारे लोखंडी औजारे, लोखंडी बौलगाडी मिळत असल्याने सुतार व लोहार कारागिरांचें गावातील व्यवसाय अडचणीत आल्याने त्याच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.त्याचप्रमाणे कुंभार करागिरांचा व्यवसायावर याचा परिणाम होत असल्याने ग्रामीण भागात सर्रासपणे सिमेंट कॉंक्रीटचे घराचे बांधकाम होत असल्याने घरात पाणी साठविण्यासाठी प्लास्टिक टाकी व हौदामुळे कुंभार कारागिरांने बनविलेले ग्रामीण भागातील रांजण व कोथळी नामशेष होत आसल्याने ग्रामीण भागातील कुंभार कारागिरांवर रोजगारीचा प्रश्न उपस्थित होत असल्याने उपासमारीची वेळ आली आहे.

### आधुनिकीकरणामुळे ग्रामीण कारागिरी धोक्यात

यापूर्वी ग्रामीण भागात शेतीसाठी शेतकऱ्यांना लागत आसलेली औजारे, पाण्याचे माठ, रांजण व कोथळी तयार करण्याचे कामे सुतार, लोहार,कुभांर या कारागिरांकडुन करुन घेत असल्याने त्यावरच कारागिरांची उपजिविका भागत असे पण आधुनिकीकरणामुळे शेतीसाठी लागणरे रेडीमेड लोखंडी औत, नांगर बैलगाडी इतर औजारे,मिळत असल्याने सुतार व लोहार कारगिरीवर परिणाम झाला आहे, तसेच प्लास्टिक पाण्याच्या टाक्या, सिंमेट हौद,थंड पाण्यासाठी इलेक्ट्रीक फ्रिज यामुळे कुभांर कारागिरावर परिणाम झाला आहे.ग्रामीण भागातील करागिरावर उपासमारीची वेळ आल्याने ग्रामीण भागाती कारागिरांवर आल्याने ग्रामीण कारागीरी धोक्यात आली आहे.

गावोगावचे कुंभार आता मातीचे बैल, गणेशमूर्ती,माठ, किल्ल्यावरील चित्रे, लक्ष्मीमूर्तीसह इतर वस्तू बनवताना दिसून येत नाहीत.तशी मागणीदेखील त्यांच्याकडे होत नाही. 'आमच्या अंगणात ना, भले मोठे रांजण आहे,'असे म्हणायचे दिवस आता गेले असून,आता 'आमच्या अंगणात दोन हजार लिटरची प्लास्टिकची टाकी असते,' असे म्हणायची वेळ आली आहे.प्लास्टिक अधिक जवळचे झाल्याने त्याचा मोठा फटका मातीच्या भांड्यांना बसला आहे.परिणामी, कुंभार व्यावसायिकांना शोभेच्या वस्तू घडविण्याची वेळ आली आहे.

सिरॅमिक,प्लास्टिक भांडीदेखील विदेशातून आयात केली जात असल्याने देशी बनावटीची भांडी जवळजवळ नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.काही वर्षांपूर्वी ताक पिण्यासाठी, दही खाण्यासाठी बुरकुळी वापरली जात.त्याची जागादेखील आता प्लास्टिकने घेतल्याचे चित्र आहे.किमतीने स्वस्त असल्याने नागरिक प्लास्टिकच्या भांड्यांचा पर्याय निवडू लागले आहेत. यामुळे मातीची भांडी बनविणारे कारागीर बेरोजगार झाल्याचे चित्र आहे.

आधुनिकतेच्या रेट्यात जशी आपली संस्कृती, परंपरा बदलल्या; त्यानुसार स्वयंपाकघरातील भांडीदेखील बदलत गेली. मातीच्या आणि विशेषतः शाडू माती, काळ्या मातीच्या वस्तू लुप्त झाल्या असून, त्याची जागा सिरॅमिक,स्टील, प्लास्टिकच्या भांड्यांनी घेतली आहे. फ्रिज आल्यापासून मातीच्या माठाची मागणी घटली, तर गॅस आल्यापासून चुलीचा वापर कमी झाला. यामुळे आधुनिकतेच्या रेट्यात मातीची भांडी हरवून गेल्याचे चित्र आहे.

# अमृत सारडा यांच्या पुढाकारातून अमरधाम येथे बसवण्यात आले नवीन शव दहन स्टॅन्ड

**बीड । प्रतिनिधी**

जिथे कमी, तिथे आम्ही या सामाजिक भावनेतून पेठ बीड शहर विकास कृती समितीचे अध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष अमृतकाका सारडा यांचे सामाजिक कार्य सतत सुरू

असते. पेठ बीड भागातील विविध अडचणी सोडवण्यासाठी अमृत काकांचा सदैव पुढाकार असतो. अमृत काका यांच्यातील माणुसकी पुन्हा एकदा पाहावयास मिळाली आहे. बीड शहरातील मोंढा रोडवरील असलेल्या अमरधाम स्मशान भूमीतील शव दहन स्टॅन्ड ची गेल्या अनेक दिवसापासून दुरावस्था झाली होती. नगर पालिकेकडे वारंवार पाठपुरावा करूनही नगरपालिकेने कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही. मात्र याबाबत अमृत काका सारडा यांनी या प्रकरणी तत्काळ दखल घेवून पुढाकार घेत पेठ बीड शहर विकास कृती समिती व सारडा चारीटेबल ट्रस्ट च्या वतीने नवीन शव दहन स्टॅन्ड उपलब्ध करून दिले आहेत. सद्या हे शव दहन स्टॅन्ड बसवण्याचे काम अमरधाम येथील स्मशानभूमीत सुरू आहे. यासाठी पेठ शहर विकास कृती समितीचे सदस्य राणा चव्हाण, संजय महाद्वार, नंदू येवले, सतपाल लाहोट, ईश्वर धनवे, विजय पिव्हळ, संजय घेणे, जयंत राऊत, लक्ष्मण शेनकुडे, गौतम



### अंत्यविधी वेळी येणाऱ्या अडीअडचणी झाल्या दूर

### पेठ बीड शहर विकास कृती समिती व सारडा चॅरिटेबल ट्रस्ट चा पुढाकार

कांबळे, शाम भागवत, मारोती तीपाले, श्रीराम लाखे, विकास जोगदंड, बाळू जोगदंड, प्रेम चांदणे, विठ्ठल जाधव, सुशील खटोड, महादेव वाघमारे, विशाल कांबळे, दादा हातागळे सादिक भाई, अमोल पवळ, लक्ष्मण गलांडे, दादा चांदणे, रतन कांबळे, राम इगडे, प्रभाकर शिंदे, संजय राजहंस, मिलिंद महाजन, सोनू पांडे, सोमनाथ राऊत, महेंद्र सारडा, दिनेश मुंदडा, पांडूशेठ भुतडा, अशोक मंत्री, बालासेठ चरखा,नितीन इगडे, नितीन साखरे, अमोल चीपाडे, अमोल शेटे, राहुल साळवे, विशाल कांबळे, किरण शिंदे, विनोद कोकाटे, प्रज्वल ससाणे, राणा जाधव, आविनाश कांबळे, अनिकेत देवडे, प्रतीक ससाणे, श्रेयस शिंदे, सत्यजीत पारवे, शुभम कांबळे, अमोल शिंदे, बंटी साळवे, शुभम लव्हारे, हसन कळवात, दत्ता वाघमारे, राहुल कोकाटे यांनी मोठे परिश्रम घेतले. गेल्या अनेक दिवसापासून अमृत काका यांचा अमरधाम येथील शव दहन स्टॅन्ड बसवण्यासाठी पाठपुरावा सुरू होता अखेर अमृत काका यांनी याप्रकरणी गंभीर दखल घेऊन सोलापूर जिल्ह्यातून नवीन शवदहन स्टॅन्ड आणून अमरधाम येथील स्मशानभूमीत बसविले आहेत. अमरधाम येथील शव दहन स्टॅन्ड ची दुरावस्था झाल्यामुळे अंत्यविधी प्रसंगी अनेक अडचणी निर्माण होत होत्या. आता नवीन शव दहन स्टॅन्ड उपलब्ध झाल्यामुळे अंत्यविधी वेळी येणाऱ्या अडचणी दूर झाल्या आहेत. तसेच अमरधाम मधील इतर शव दहन स्टॅन्डची सुद्धा दुरुस्ती करण्यात येत आहे. पेठ बीड शहर विकास कृती समिती व सारडा चॅरिटेबल ट्रस्टचे याबद्दल पेठ बीड भागातील नागरिकांनी आभार मानले आहेत. पेठ बीड शहर विकास कृती समितीचे सर्व पदाधिकारी यांनी यासाठी मोठे परिश्रम घेतले.

# डॉ.ज्योती मेटे यांचे जिल्ह्यात ठिकठिकाणी जंगी स्वागत

## स्वागतासाठी जिल्ह्याच्या वेशीवर २०० गाड्यांचा ताफा; शेंडी तुटो वा पारंबी एकदा निर्णय घेतला तर माघार नाही – डॉ.ज्योती मेटे

**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूक लढवण्यासंदर्भात आपला दूरदूर पर्यंत विचार नव्हता परंतु जनसामान्यातील, तळागाळातील व्यक्तीची मी निवडणूक लढवली पाहिजे या इच्छे खातर मी या मैदानात उतरले आता शेंडी तुटो वा पारंबी एकदा निर्णय घेतला तर माघार नाही. असे मत डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी त्यांचे बीड जिल्ह्यात करण्यात आलेल्या अभुतपूर्व स्वागतानंतर संवाद साधताना व्यक्त केले.

जिल्ह्यातील बहुसंख्य सामान्य मतदारांना डॉ. ज्योती मेटे या लोकसभेला उमेदवार असल्या पाहिजेत अशी इच्छा होती जनतेने आपल्या इच्छा त्यांच्यापर्यंत पोहोचविल्या आणि जनभावनेचा आदर करत डॉ. मेटे यांनी निवडणूक लढवण्यास समर्थता दर्शवली

मात्र राष्ट्रवादी शप गटाकडून बजरंग सोनवणे यांची उमेदवार जाहीर झाली असली तरी सर्वसामान्य जनतेने डॉ.ज्योती मेटे यांचे जिल्ह्यात जल्लोषात स्वागत केले यावेळी घोषणाबाजी करून ताईंनी





निवडणूक लढवावी अशी उपस्थितांची मागणी होती.

डॉ. ज्योती मेटे या संभाजी नगर वरून गवेराई मार्गे बीड येथे आल्या यात जिल्ह्याच्या वेशीवर राक्षस भवन फाटा येथे त्यांचे जंगी स्वागत केले तिथून जायकवाडी कॅम्प, बागपिंपळगाव, गेवराई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक गेवराई, पाडळशिंगी, पारगाव, महालक्ष्मी चौक अश्या ठिकठिकाणी त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. तसेच यावेळी त्यांनी मादळमोही येथे आयोजित इफ्तार पार्टी कार्यक्रमाला उपस्थिती लावली गेवराई आणि बीड शहरातील महापुरुषांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून शिवसंग्राम भवन येथे जनतेशी संवाद साधला

यावेळी डॉ. ज्योती मेटे महणल्या की, गेल्या एक दीड वर्षामध्ये अनेक आघात पाचवले आहेत. लोकसभा निवडणूक लढवण्याचा दूर दूर पर्यंत विचार नव्हता लक्ष फक्त लोकनेते विनायकराव मेटे यांच्या निधना नंतर त्यांचे जे धेय्य होते ते गाठण्याचे काम आपण करत होतो. परंतु गेल्या काही दिवसांमध्ये बीड जिल्ह्यातील अनेक सर्वसमन्या, प्रस्तापित, विस्तापित यांच्या मधून मागणी पुढे आली की बीडच्या खासदार पदाचा उमेदवार मी असावा कदाचित स्वर्गीय विनायकराव मेटे साहेबांनी त्यांच्या हयातीत कायम शेवटच्या श्वास पर्यंत केलेले समाज कार्यामुळेच लोकांना त्यांच्या पश्चात माझ्यात विस्तापिताचा चेहरा वाटला असावा म्हणून ही मागणी पुढे आली असावी. मी बीड मध्ये आल्या नंतर येवढे मोठ्या संख्येने आपण माझ्या स्वागतासाठी अलात त्यामुळे मला असे वाटते की हे शिव धनुष्य मला पेलावे लागणार आता शेंडी तुटो वा पारंबी एकदा निर्णय घेतला तर माघार नाही. असे मत डॉ. मेटे यांनी व्यक्त केले.

# ब्लॅकमेल करण्याचे कटकारस्थान देवेंद्र फडणवीसांचेच; नाना पटोले यांचा आरोप

**नागपूर । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाने मागील १० वर्षात अत्यंत खालची पातळी गाठत खूनशी व कपटी राजकारण करुन विरोधकांना संपवण्याचे काम केले. महाराष्ट्रातील काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना सरकारी यंत्रणेला हाताशी धरून ब्लॅकमेल केले. भाजपच्या या खूनशी राजकारणावर काँग्रेस पक्षाने सातत्याने आवाज उठवला आणि अखेर सत्य समोर आले. विरोधकांना भ्रष्ट ठरवून बदनाम करण्याचे षडयंत्र रचणारा दुसरे कोणी नाही तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच आहेत हे भाजपाचे माजी खासदार किरीट सोमय्यांनी यांनीच उघड करत फडणवीसांच्या कपटी व खूनशी राजकारणाचा बुरखा टराटरा फाडला आहे, असा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला.

यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले पुढे म्हटले की, भाजपाचे माजी खासदार किरीट सोमय्या





हे विरोधी पक्षाच्या नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप करायचे, ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्स विभागाच्या मदतीने त्यांच्यावर कारवाई करावण्यास लावायचे. या ब्लॅकमेलिंगला कंटाळून अनेकांनी भाजपात प्रवेश केला. भाजपात प्रवेश करताच त्यांना सन्मानाने संवैधानिक पदे दिली. या सर्व प्रकरणाचा सुत्रधार हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत, त्यांच्या सांगण्यावरूनच आपण काम केले. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याविरोधातही कटकारस्थान करण्यास फडणवीस यांनीच आदेश दिले होते हे उघड केल्याने देवेंद्र फडणवीस यांचा खरा चेहरा जनतेसमोर आला आहे. भ्रष्टाचाराच्या नावाखाली महाराष्ट्रात पद्धतशीरपणे एक रॅकेट चालवले गेले व हे रॅकेट चालवणारा खलनायक देवेंद्र फडणवीस आहेत हे आता लपून राहिलेले नाही असा खोचक टोलाही यावेळी लगावला.

महाराष्ट्राला एक मोठी राजकीय परंपरा लाभलेली आहे, या परंपरेला देवेंद्र फडणवीस यांनी काळीमा फासला आहे. विरोधकांना शत्रू समजून त्यांना बदनाम करणे, त्यांची राजकीय कारकिर्द संपवणे, खोटे आरोप लावून नाहक त्रास देणे हे सर्वांमागे फडणवीस यांचाच प्रताप होता. सोमय्या यांनीच सर्व उघड केल्याने भारतीय जनता पक्षाची भ्रष्टचाराविरोधातील लढाई ही केवळ विरोधकांना संपवण्यासाठी होती हे स्पष्ट दिसत आहे. त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांना सोडणार नाही पण त्यांना ब्लॅकमेल करुन भाजपात सन्मानाने प्रवेश देणार हाच त्यांचा राजकीय अजेंडा आहे हे उघड झाले आहे. आता जनताच भाजपाला घरी बसवून त्यांची जागा दाखवतील असेही नाना पटोले यांनी आशा व्यक्त केली.

# वंचितकडून शिरुरमधील मंगलदास बांदल यांची उमेदवारी रद्द

**मुंबई । प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीच्यावतीने शिरुर लोकसभा मतदारसंघातून मंगलदास बांदल यांच्या उमेदवारीची घोषणा करण्यात आली होती. तसेच, वंचित बहुजन आघाडीने बारामती मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे उमेदवार सुप्रिया सुळे यांना आपला पाठिंबा देत तेथे उमेदवार न देण्याचे धोरण ठरवले होते.

बारामतीबाबत जो निर्णय वंचितने घेतला, त्या विरोधात मंगलदास बांदल गेल्याने वंचित बहुजन आघाडीने मंगलदास बांदल यांची शिरुर लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर आणि प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर यांच्या सूचनेनुसार रद्द करण्यात आली आहे. वंचित बहुजन आघाडीने मनसेचे नाराज



नेते वसंत मोरे यांना पुणे मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. तर दुसरीकडे बारामती लोकसभा मतदारसंघात उमेदवार उभा न करता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांना पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे बारामतीत सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्यात सरळ लढत होणार आहे. वंचित बहुजन आघाडीने मंगळवारी रात्री उशीरा आपली लोकसभा उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली होती. यामध्ये पाच जणांना उमेदवारी दिली आहे. अविनाश भोसीकर (नांदेड), बाबासाहेब उगले (परभणी), अफसर खान (औरंगाबाद), वसंत मोरे (पुणे) व मंगलदास बांगल (शिरूर) यांचा यामध्ये समावेश आहे. वंचितने लोकसभा निवडणुकीसाठी आतापर्यंत एकूण २५ उमेदवार घोषित केले आहेत. नवनिर्माण सेनेचे माजी नगरसेवक वसंत मोरे यांनी काही दिवसांपूर्वी मनसेला अखेरचा जय महाराष्ट्र केला होता.

# भिवंडीत काँग्रेस बंडखोरीच्या तयारीत



### काँग्रेस ही जागा का लढत नाही हे सांगावे

जर महाविकास आघाडी ही जागा काँग्रेसला सोडत नसेल तर आपण ही जागा का लढवत नाही हे काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी भिवंडीमध्ये येऊन पदाधिकाऱ्यांना सांगावे. जर काँग्रेसने ही जागा घेतली नाही आणि कार्यकर्ते म्हणाले की अपक्ष लढायच किंवा मैत्रीपूर्ण लढायचे तर तरीही आम्ही तयार आहोत. मात्र आम्ही आता टोकाची भूमिका घेणार आहोत असे दयानंद चोगरे यांनी सांगितले.

**ठाणे । प्रतिनिधी**

सांगलीच्या जागेनंतर आता भिवंडीतही महाविकास आघाडीमध्ये वादाची ठिगणी पडताना दिसत आहे. राष्ट्रवादीने बाळ्यामामा म्हात्रेंना उमेदवारी जाहीर केल्यानंतर आता त्या ठिकाणी काँग्रेस पक्षाकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. पैशांवाल्यांना जर उमेदवारी द्यायची असेल तर मग आम्ही काम करणार नाही असा पवित्रा घेत काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादीच्या उमेदवाराला विरोध केल्याचे दिसत आहे. आता वरून जरी आदेश आला तरी आम्ही काम करणार नाही, सर्वजण राजीनामा देऊन अशी भूमिका काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची असल्याचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी सांगितले.

काँग्रेसचे ठाणे जिल्हाध्यक्ष दयानंद चोरगे म्हणाले की, कोकण विभागामध्ये आतापर्यंत आम्ही तीन जागा लढत होतो. मात्र यावेळी एकही जागा लढत नाही. कोकणात पंजामुक्त काँग्रेस असा प्रयोग करायचा आहे का? आमचा विरोध असतानाही राष्ट्रवादीने ही घोषणा केलेली आहे. त्यामुळे सर्व पदाधिकाऱ्यांमध्ये मोठी नाराजी आहे. त्यासाठी सर्व पदाधिकारी आज एकत्र बैठक घेत असून पुढील भूमिका ठरवणार आहोत.

# राजीनामा अस्त्राचा फायदा कोणाला?

**भूम । प्रतिनिधी**

उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघाची महायुतीची उमेदवारी भाजपाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चनाताई पाटील यांना जाहीर झाली आहे. आपल्यालाच किंवा आपल्या नेत्याला उमेदवारी मिळावी म्हणून गेल्या अनेक दिवसापासून प्रयत्नशिल असलेल्या शिवसेना (शिंदे गट) व राष्ट्रवादी काँग्रेसचे एकनिष्ठ नेते, कार्यकर्ते यांच्या मनसुब्यावर पाणी फेरले आहे. परिणामी या दोन्ही पक्षातील नाराज पदाधिकाऱ्यांनी राजीनाम्याचे अस्त्र बाहेर काढले आहे. महायुतीतील राजीनामा सत्राचा फायदा अर्चनाताई पाटील (घड्याळाला) होणार की ओमराजे निंबाळकर (मशालीला) होणार, याकडे लक्ष लागले आहे.

उस्मानाबाद मतदारसंघ महायुतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला गेला. त्यामुळे नाराज झालेल्या शिवसेनेच्या (शिंदे गट) पदाधिकाऱ्यांनी उमेदवार बदला, अशी भूमिका घेऊन पदाचे राजीनामे देण्यास सुरूवात केली आहे. लोकसभेसाठी इच्छुक असलेले प्रा.सुरेश बिराजदार यांनाही राष्ट्रवादीने उमेदवारी न दिल्याने त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिले आहेत. भाजप आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चनाताई पाटील यांना राष्ट्रवादीत प्रवेश देऊन उमेदवारी दिली पण निष्ठावान



असलेल्या प्रा. बिराजदार यांना उमेदवारी दिली नाही. त्यामुळे राष्ट्रवादीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यामध्ये नाराजी आहे. सध्या धाराशिव जिल्ह्यामधील भूम, परंडा, वाशीच्या पदाधिकाऱ्यांनी राजीनामा सत्र सुरू केले आहे.

घड्याळ चिन्ह हद्दपार करण्यासाठी आम्ही लढलो, फिरलो. धनुष्यबाणाला मते मागितली. परंतु या लोकसभा निवडणुकीत घड्याळ चिन्हाला मत मागण्याची वेळ शिवसैनिकावर आल्याचे पदाधिकारी बोलत आहेत. ज्या कुटुबांच्या घरात पिढ्यानपिढ्या राजकारण आहे, त्याच घरात पुन्हा उमेदवारी दिली जात असल्याने बाकीच्या कार्यकर्त्यांनी फक्त सतरंज्याच उचलायच्या का, असाही खोचक सवाल केला जात आहे. जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करणाऱ्या उमद्या नेतृत्वाला उमेदवारी द्यायला हवी होती. परंतु जिल्ह्यामध्ये धनुष्यबाण चिन्ह गोठवण्याचे काम महायुतीच्या नेत्यांनी केले आहे. हे अत्यंत नींदनीय असून याचा आगामी निवडणुकीत निश्चितपणे परिणाम होणार आहे. मतदार राजा मतदान रूपाने दाखवून देईल. असे सांगत घराणेशाही सोडून इतर कोणालाही तिकीट दिले असते तर निश्चितपणाने आम्ही सर्व तन-मन-धनाने कामाला लागलो असतो. परंतु जे नको हवे होते, तेच आमच्या पुढे उभा केले असल्याने आम्ही आमच्या पदाचा राजीनामा दिला आहे, असे शिवसैनिक सांगत आहेत. वेळ अजूनही गेलेली नाही. जिल्ह्यात शिवसेना अबाधीत राहण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विचार करून योग्य त्या नेत्याला उमेदवारी देऊन शिवसेनेचे धनुष्यबाण चिन्ह द्यावे, अशी अपेक्षा केली आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटांमध्येही नाराजीचा सूर निघत आहे. दरम्यान पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेऊन राजीनामे दिले असून नाराजी उघडपणे बोलून दाखवली आहे. लोकसभेच्या निवडणुकीत या राजीनामा अस्त्राचा फायदा मशालीचा होणार की, घड्याळाला होणार हे निकालानंतरच स्पष्ट होणार आहे.

# काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर मुस्लिम लीगची छाप –नरेंद्र मोदी

**लखनौ । वृत्तसेवा**

लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्यावर मुस्लिम लीगची छाप आहे. जुनी काँग्रेस यामध्ये कोठेही दिसत नाही. यामध्ये डावे प्रबळ झाले आहेत. जे मतदारसंघ काँग्रेसचे बालेकिल्ला मानला जात होते त्या जागांवरही काँग्रेस उमेदवार उभे करण्याचे धाडस करत नाही. काँग्रेस ज्या काँग्रेस ज्या व्यक्तीला तिकीट देत आहे तो दुसऱ्या दिवशी काँग्रेस सोडत आहे, अशा शब्दांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर प्रदेशमधील जाहीर सभेत काँग्रेसवर हल्लाबोल केला.

काँग्रेस पक्षाकडे ना देशहिताची धोरणे आहेत ना देश उभारणीचा दृष्टीकोन आहे. आजच्या भारताच्या आशा आणि आकांक्षांपासून काँग्रेस पक्ष पूर्णपणे तुटलेला आहे. स्वातंत्र्य चळवळीत मुस्लिम लीगमध्ये जी विचारसरणी प्रचलित होती तीच विचारसरणी काँग्रेसच्या जाहीरनाम्यात दिसून



येते. काँग्रेसच्या जाहीरनाम्यात काँग्रेस अजिबात दिसत नाही. अशी काँग्रेस भारताला २१ व्या शतकात पुढे नेऊ शकत नाही, असा दावाही नरेंद्र मोदी यांनी केला. यावेळी नरेंद्र मोदी म्हणाले की, समाजवादी पार्टीला तासाला उमेदवार बदलावे लागतात. या पक्षाला उमेदवार मिळत नाहीत. उत्तर प्रदेशमध्ये फ्लॉप झालेल्या दोन मुलांची भूमिका असलेला चित्रपट पुन्हा प्रदर्शित झाला आहे, असा टोलाही त्यांनी राहुल गांधी आणि अखिलेश यादव यांना लगावला. इंडिया आघाडी जिंकण्यासाठी नाही तर एनडीए आघाडीला ४०० पेक्षा कमी जागांवर रोखण्यासाठी लढत आहे. भ्रष्टाचारी एकत्र येऊन मोदींना धमकावत आहेत. मोदी मागे हटणार नाहीत. भ्रष्टाचाराविरुद्ध त्वरीत कारवाई सुरूच राहील, असा पुनरुच्चारही त्यांनी केला.

भाजप सरकारने तिहेरी तलाकची वाईट प्रथा संपवली आहे. मुस्लिम भगिनींच्या हितासाठी काम केले. त्यांना प्रतिष्ठा बहाल केली आहे. याचा फायदा केवळ मुस्लिम महिलांनाच झाला नाही तर तिच्या संपूर्ण कुटुंबालाही फायदा झाला. जावई रागावला तर तिहेरी तलाक देईल, अशी भीती महिलेचा भाऊ, वडील, आई यांना वाटत होती. तिहेरी तलाकचा कायदा रद्द करून आम्ही केवळ मुस्लिम महिलांनाच नाही तर संपूर्ण मुस्लिम कुटुंबाला वाचवले. त्यासाठी मुस्लिम कन्या पुढील शतके मोदींना आशीर्वाद देत राहतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# देविदास शिंदे बीड लोकसभा निवडणुक अपक्ष लढवणार

**शिरूर । प्रतिनिधी**

मातोरी गावचे भूमिपुत्र तथा विद्यमान सरपंच, सामाजिक व राजकीय क्षेत्रामध्ये नव्याने ओळख झालेले देविदास शिंदे हे बीड लोकसभा अपक्ष निवडणूक लढवण्याच्या तयारीत असून लोकसभा निवडणुकीच्या रिंगणामध्ये उतरण्यासाठी त्यांनी गावोगावी भेटी-गाठी देत मित्र परिवारामध्ये आपला संपर्क वाढवला आहे.

शिरूर कासार तालुक्यातील मौजे मातोरी या गावचे विद्यमान सरपंच देविदास यशवंत शिंदे गेल्या अनेक वर्षापासून राजकीय व सामाजिक क्षेत्रामध्ये सक्रिय झाले आहेत. त्यांनी आपल्या कारकिर्दीवर गावचे सरपंच पद हे आपल्याकडे प्रस्थापित केले आहे. गोरगरीब जनतेच्या कामांना प्राधान्य देणे, ग्रामीण भागातील विकास कामाबद्दल कटीबद्ध राहून



गावामध्ये विकासाची कामे घडवून आणणे हे शिंदेने प्रकर्षाने कार्य चालवले आहे. शिरूर तालुक्यातीलच नव्हे तर बीड जिल्ह्यातील गोरगरीब जनतेला न्याय मिळावा यासाठी यावेळी त्यांनी बीड लोकसभा निवडणुकीमध्ये उडी घेऊन अपक्ष निवडणूक लढवण्याची तयारी धरली आहे. आपण जर निवडून आलो तर जनतेला एक हक्काचा खासदार मिळालेला असेल,की जो खासदार सामान्य जनतेमध्ये बसन गोरगरीब जनतेचे प्रश्न सोडवणारा असेल आणि याच मुद्द्यावरती आपण जनतेसमोर जाऊन मत मागणार असल्याची माहिती यावेळी देविदास शिंदे यांनी पत्रकारांना दिली आहे. बीड जिल्ह्यामध्ये शिरूर कासार या तालुक्याकडे एक मागासलेला तालुका म्हणून पाहिले जाते. या तालुक्याचे मागासले पण घालवायचे असेल तर तालुक्याला हक्काचा लोकप्रतिनिधी हवा आहे. मायबाप जनतेने आशीर्वाद देऊन सेवा करण्याची संधी दिली तर या संधीचं सोनं करून आपण आपला पूर्ण वेळ जनतेचे सेवेतच घालवणार असेही त्यांनी यावेळी सांगितले आहे. बीड लोकसभा निवडणुकीमध्ये निवडणूक लढव हे सोपे नसले तरी जनतेचे पाठबळ माझा उत्साह वाढवीत आहे. यामुळे सर्व तयारीनिशी आपण अपक्ष निवडणूक लढवत आहोत यावेळी शिंदे बोलवून दाखवले आहे.

### शिंदेंच्या उमेदवारीने गावामध्ये उत्साही वातावरण

बीड लोकसभा निवडणुकीमध्ये महायुती, महाविकास आघाडीच्या उमेदवारावरती अनेक लोकांचा राजकीय रोष निर्माण झाला आहे. याच उमेदवारांना वारंवार पसंती देण्यासाठी आता जनता पूर्ण पणे कंटाळली पाहायला मिळत आहे. बीड लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने राजकीय क्षेत्रात मोठे वादळ जरी असले तरी मातोरी गावचा भूमिपुत्र देविदास शिंदे हा अपक्ष लोकसभा निवडणुकीमध्ये निवडणूक लढवणार असल्यामुळे गावामध्ये ,मित्र परिवारामध्ये मोठे उत्साही वातावरण पाहायला मिळत आहे. देविदास शिंदे यांच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभे राहू असेही अनेकांनी बोलून दाखवले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायक्षेत्रे. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
रविवार दि.०७ एप्रिल २०२४ | पान ७

# पुणे कँटोन्मेंट विधानसभा मतदारसंघाच्यावतीने निवडणूक कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन

## निवडणूक प्रक्रियेचे महत्व जाणून विहित पद्धतीने कर्तव्य पूर्ण करा–जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे

पुणे । प्रतिनिधी

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या कामकाजासाठी नियुक्त केलेल्या प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्यांनी निवडणूक प्रक्रियेचे महत्व लक्षात घेवून विहित पद्धतीने कर्तव्य पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले.

पुणे कँटोन्मेंट विधानसभा मतदारसंघाच्यावतीने गंज पेठेतील सावित्रीबाई फुले सभागृहात आयोजित प्रथम निवडणूक कर्मचाऱ्यांच्या दुसऱ्या प्रशिक्षण सत्रास भेटीप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी अनिल पवार, पुणे कँटोन्मेंट विधानसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक अधिकारी सिद्धार्थ भंडारे, तहसीलदार ज्योती देवरे, निवडणूक नायब तहसीलदार चित्रा ननावरे आदी उपस्थित होते.

मतदानाची कार्यपद्धती सांगून जिल्हाधिकारी डॉ. दिवसे म्हणाले,



सर्वसमावेशक आणि सर्वांना सोयीची होईल अशी निवडणूक घेण्यासाठी जिल्ह्याची तयारी पूर्ण झाली आहे. मतदान हा त्यातील महत्वाचा भाग आहे. दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी मतदानाच्यावेळी रांगेत उभे न राहता त्वरीत सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. निवडणूक कर्तव्यासाठी नेमलेल्या अधिकाऱ्यांनी कायदेशीर प्रक्रिया, माहिती पुस्तीका याचे अवलोकन करून कामकाज पहावे.

कर्मचाऱ्यांना ईव्हीएम यंत्राबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे माहिती द्यावी. हेतूपुरस्सर निवडणूक कामकाजाकडे दुलर्क्ष करणे, वेळ न पाळणे अशी बाब आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. मतदान केंद्रवर स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, रॅम्प अशा सुविधा पुरविण्यात याव्यात, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

श्री. भंडारे म्हणाले, निवडणूक प्रक्रिया हा लोकशाहीचा सोहळा आहे. या कामामध्ये न्युनगंड न बाळगता प्रत्येकाने मनापासून सहभागी व्हावे. सर्वांनी मतदान प्रक्रिया समजून घेणे आवश्यक आहे. ईव्हीएम यंत्र हाताळण्याचे प्रात्याक्षिक प्रत्येकाने करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी तीन प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले. प्रशिक्षणामध्ये ईव्हीएम यंत्र हाताळणे, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक मतदारांसाठी करावयाची कार्यवाही, ईव्हीएमची वाहतूक, मतदान केद्रांची रचना, केंद्रावरील सुरक्षाव्यवस्था, निवडणुकीच्या दिवशी मतदान सुरू होण्यापूर्वी करण्यात येणारे अभिरूप मतदान, मतदानाच्यावेळी तांत्रिक बिघाड निर्माण झाल्यास करावयाच्या उपायोजनांबाबतही माहिती देण्यात आली. मतदानाच्यावेळी निवडणूक आयोगांच्या सूचनांबाबतही यावेळी सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात आली. तहसीलदार श्रीमती देवरे यांनी मतदान प्रक्रियेविषयी मार्गदर्शन केले.

# बंधुत्वाची व राष्ट्रीय एकतेची भावना उत्तरोत्तर वाढत राहो – पोलीस उपायुक्त आर. राजा



पुणे । प्रतिनिधी

आपल्या भारत देशाला समृद्ध परंपरा आहे. सर्व धर्मीय सण व उत्सवाच्या माध्यमातून ही परंपरा अधोरेखित होते. अशा उत्सवाच्या निमित्ताने आपण सर्वजण एकत्र येतो व आपल्या विचारांची देवाण–घेवाण करतो. कायदा व सुव्यवस्थेचे पालन करीत, हे उत्सव एकमेकांचा आदर करीत उत्साहात साजरे करतोय. ही बंधुत्वाची व राष्ट्रीय एकतेची भावना उत्तरोत्तर वाढत राहो. अशा सदिच्छा परिमंडळ ५ चे पोलीस उपायुक्त आर राजा यांनी दिल्या.

शिवसमर्थ संस्थेच्या वतीने हडपसर येथील महात्मा फुले वसाहत मध्ये विद्यार्थ्यांसाठी रोजे इफ्तार या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. उपक्रमाचे हे सहावे वर्ष होते. यावेळी उपस्थित विद्यार्थी व नागरिकांना पोलीस उपायुक्त आर राजा यांनी संबोधित केले. याप्रसंगी हडपसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पांढरे, सहाय्यक फौजदार दिनेश शिंदे, गाडीतळ येथील गुरुद्वाराचे ग्यानीजी, डॉ. बच्चूसिंग टाक, सामाजिक कार्यकर्ते बंडू पाडळे आदी मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आयोजन शिवसमर्थ संस्थेच्या अध्यक्षा मनीषा वाघमारे, सुरज अग्रवाल, पार्थ वाघमारे, अभ्यासिका शिक्षिका सना पठाण, प्रियांका पाटील, नाजमीन मुजावर, नेहा टाक, शुभांगी कोल्हार, वैभवी विधाते, श्रावणी भोसले, नेहा शेख, अपेक्षा गायकवाड यांनी केले.

रोजे इफ्तार नंतर आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमास डॉ. शंतनू जगदाळे व सामाजिक कार्यकर्ते अक्षय आबनावे, आलमगीर मस्जिदचे मेहबूब शेख, हमीद शेख यांची उपस्थिती होती.

# मज झाली सावळ बाधा.. मी झाले ना रे राधा

पुणे : राधा अन् कृष्णाचे अपरिपक्वतेतून परिपक्वतेपर्यंत प्रवाहित झालेले नाते, अल्लड वयात मातृत्व पेलणाऱ्या आणि पुढे राजमातेचे आयुष्य जगणाऱ्या कुंतीचे कृष्णाशी असलेले अनुबंध तर कृष्णसख्याला साद घालणारी द्रौपदी यांचे भावविश्व उलगडले ते 'कृष्णकिनारा.. त्या तिघी..' या नृत्यनाट्य आणि अभिवाचनाच्या अनोख्या संगमातून.

प्रसिद्ध लेखिका अरुणा ढेरे यांच्या 'कृष्णकिनारा' या साहित्यकृतीवर आधारित वैशिष्ट्यपूर्ण असा हा कार्यक्रम शुक्रवारी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या बालशिक्षण सभागृहात आयोजित करण्यात आला होता. अरुणा ढेरे, ज्येष्ठ कथक नृत्यगुरू मनिषा साठे, ज्येष्ठ कथक नृत्यगुरू शमा भाटे, ज्येष्ठ भरतनाट्यम्‌ नृत्यगुरू सुचेता भिडे–चापेकर, स्मिता महाजन, स्वाती दातार, तेजस्विनी साठे यांच्यासह कला क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

'मज झाली सावळ बाधा.. मी झाले ना रे राधा' असे राधा आणि कृष्ण यांचे अल्लड वयातील फुललेले प्रेम, राधेचे कृष्णमय होणे, कृष्णाने गोकुळ सोडल्यानंतर राधेच्या भावविश्वात झालेली उलथापालथ आणि उतार वयात राधा–कृष्णाची झालेली प्रगल्भ



भेट याचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. राजकन्या कुंती लहान वयातच दत्तक दिली गेली यामुळे तिच्या मनावर झालेले आघात तसेच अपरिपक्व वयातील मातृत्व, जे ती उघडपणे स्वीकारू शकली नाही त्यामुळे झालेला अपत्य विरह, पुढील आयुष्यात पत्नी, राजमाता इ. भूमिका निभावताना आलेले कठीण प्रसंग. द्रौपदीच्या मनाची उलघाल समजून घेतली तरी तिला मार्ग न दाखवू शकणारी कुंती कलाकरांनी ताकदीने उभी केली. द्रौपदीच्या आयुष्यातील प्रसंग दर्शविताना अर्जुनासह विवाहप्रसंगी कृष्णाशी जडलेले सख्याचे नाते, पाच पतींची पत्नी म्हणून भोगावी लागलेली अवहेलना, अर्जुनाने केलेल्या इतर विवाहांमुळे दुखावलेली द्रौपदी, द्युताच्या खेळात पणाला लागलेली असताना कृष्णसख्याने वाचविलेली अब्रु, त्यासाठी तिने केलेला धावा असे प्रसंग अभिवाचन आणि नृत्यनाट्याच्या आविष्कारातून रसिकांसमोर उलगडत गेले.

मृण्मयी कुलकर्णी, भक्ती झळकी–कुलकर्णी, उत्कर्षा दगडे, ऐश्वर्या साने–थत्ते, कल्याणी सवडकर, मानसी भागवत आणि मैथिली पुंडलिक यांनी कथक नृत्याविष्कारातून राधा, कुंती आणि द्रौपदी यांच्या आयुष्यातील विविध प्रसंग साकारले. काव्यात्मक गद्य अशा स्वरूपात असलेल्या लिखाणातील गद्य भाग वंदना बोकील–कुलकर्णी यांनी सशक्त अभिवाचनाच्या माध्यमातून सादर केला. मृण्मयी कुलकर्णी यांचे दिग्दर्शन होते. पहिल्याच नृत्यनाट्य अभिवाचनाच्या या अनोख्या प्रयोगास रसिकांनी भरभरून दाद दिली.

अरुणा ढेरे म्हणाल्या, कृष्णाला मध्यवर्ती भूमिकेत ठेवून कल्पनेतल्या कथेतील पात्रांना प्रत्यक्ष समजत मांडणी केली आहे. हे सादरीकरण म्हणजे माध्यमांतर आहे. अरुणा ढेरे यांचे स्वागत मनिषा साठे यांनी केले. कार्यक्रमाविषयीची माहिती मृण्मयी कुलकर्णी यांनी दिली तर आभार भक्ती झळकी–कुलकर्णी यांनी मानले

# अजितदादांकडून दिलीप वळसे पाटलांच्या प्रकृतीची विचारपूस, ज्युपिटर रुग्णालयात घेतली भेट

पुणे । प्रतिनिधी

अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते दिलीप वळसे पाटील यांच्या प्रकृतीची उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विचारपूस केली. ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये जाऊन अजित पवारांनी वळसे पाटलांची भेट घेतली व त्यांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस केली. काही दिवसांपूर्वी दिलीप वळसे पाटील यांच्या खुब्याला मार लागला होता. त्यानंतर त्यांची शस्त्रक्रिया होणार असल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले होते.

दिलीप वळसे पाटील त्यांच्या घरातच पाय घसरु पडले होते. मात्र, पडल्याने त्यांना मोठी दुखापत झाली होती. वळसे पाटली यांच्या खुब्याला मार लागला होता. शिवाय, हातही फ्रॅक्चर झाला होता. त्यानंतर पुण्यातील ज्युपिटर रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले होते. वळसे पाटलांना झालेले दुखापत अजित पवारांच्या राष्ट्रवादीसाठी डोकेदुखी ठरणार आहे. कारण ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर



त्यांच्या मोठ्या नेत्याला दुखापत झाली होती.

**आढळराव पाटलांच्या प्रचार करता येणे कठीण**

अजित पवारांच्या राष्ट्रवादीने शिवाजी आढळराव पाटील यांना शिंदे गटाकडून आयात करुन उमेदवारी दिली आहे. शिरुर लोकसभा मतदारसंघातून आढळराव पाटलांच्या विरोधात पुन्हा अमोल कोल्हे निवडणूक लढवत आहेत. मात्र, गेल्या वेळी ज्या उमेदवाराचा प्रचार केला. त्याच उमेदवाराचा प्रचार यावेळी वळसे पाटलांना करावा लागणार आहे. शिरुर लोकसभेतच वळसे पाटील यांचा तालुका आहे. मात्र, आढळराव पाटलांच्या प्रचारास मैदानात उतरणे वळसे पाटलांना कठिण झाले आहे.

# जो पाणी देईल त्याच्याच पाठीशी मतदार

ओतूर । प्रतिनिधी

डुंबरवाडी, खामुंडी, गायमुखवाडी (ता. जुन्नर) या गावांना वगळून चिल्हेवाडी व पिंपळगाव जोगा धरण प्रकल्पाचा कालवा आणि बंदिस्त जलवाहिनी योजना राबविण्यात आल्याने ही तीनही गावे पाण्यासाठी टाहो फोडत असल्याची माहिती खामुंडीचे सामाजिक कार्यकर्ते कैलास बोडके, अनिल बोडके व श्रीकाळभैरवनाथ देवस्थान ट्रस्टचे कार्याध्यक्ष संदीप गंभीर यांनी दिली.

ज्या पाच धरणांमुळे जुन्नर तालुका सुजलाम, सुफलाम झाला आहे. त्या तालुक्यातील तब्बल तीन गावे पाण्यापासून वंचित राहावीत ही खेदाची बाब असून, या भागात पाण्याची कुठलीच सोय नसल्याने आणि जुन्नर तालुक्यातील नेते मंडळींनी व्यवस्थित लक्ष न दिल्याने प्रत्येक उन्हाळ्यात या गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. या तीन गावांचा विचार करून एखादी योजना राबविली असती, तर दुष्काळसदृश्य



परिस्थिती प्रत्येक वर्षी निर्माण झाली नसती, असे येथील ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

या गावांच्या शेजारीच असलेल्या डोंगराच्या पायथ्यापासूनच्या जागेतून बंदिस्त जलवाहिनी किंवा पिंपळगाव जोगा धरणाचा कालवा मार्गस्थ झाला असता, तर आज या गावांमध्येदेखील हरितक्रांती झाली असती; सोबत सध्या सुरू असलेल्या चिल्हेवाडी बंदिस्त जलवाहिनी योजनेतून एस्केप टाकून व नेते मंडळींनी निधीची तजवीज केल्यास खामुंडी गावच्या पाझर तलावात पाणी सोडून सर्वांची तहान भागवता आली असती व शेतकर्यांना विद्युत पंपाद्वारे शेतीलादेखील पाणीपुरवठा करता आला असता.सध्या शिरूर लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी जोरात सुरू असून, तिरंगी लढतीच्या रिंगणातील कोणता उमेदवार या तीन गावच्या पाणी प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून ठोस पावले उचलणार त्याच्याच पाठीशी आम्ही मतदार उभे राहणार अशी चर्चा मतदारामधून व्यक्त होत आहे, आम्हाला केवळ आश्वासन नको; आमच्या हक्काच्या पाण्याची सोय तत्काळ करा, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत. अन्यथा आम्ही मतदानावर बहिष्कार घालण्याचा पवित्रा घेणार आहोत, असा सज्जड इशारा मतदार करीत आहेत.दरम्यान, अणेमाळशेज पट्ट्यातील गावांमधून तीव्र कडक उन्हाच्या काहिलीने भलतीच ताप पडू लागली आहे. परिणामी, येथील विहिरींनी तळ गाठला असून, सर्व तलाव, ओढे, कूपनलिका कोरड्याठाक पडू लागल्या आहेत. भूगर्भातील पाणीपातळी झपाट्याने खालावू लागल्याने व अद्याप अडीच महिने पावसाची वाट पाहावी लागणार असल्यामुळे जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा व शेतीसाठी लागणार्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीरस्वरूप धारण करू लागल्यामुळे शेतकरीवर्गातून चिंता व्यक्त केली जात आहे.

# नावडतीचे मीठ आळणी! पहिल्याच टर्ममध्ये तीन वेळा संसदरत्न मिळाल्याने आढळराव पाटलांच्या पोटात दुखतंय, अमोल कोल्हेंचा घणाघात

पुणे । प्रतिनिधी

शिरूर लोकसभा मतदारसंघात डॉ. अमोल कोल्हे विरुद्ध शिवाजीराव आढळराव पाटील अशी लढत होणार आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. अमोल कोल्हे आणि शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या आरोपांच्या फैरी सुरु आहे. आता अमोल कोल्हे यांनी पुन्हा एकदा आढळराव पाटलांवर निशाणा साधला आहे. पहिल्याच टर्म मध्ये तीनवेळा संसदरत्न मिळाला म्हणून आढळराव पाटील यांच्या पोटात दुखत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

हडपसर येथे डॉ. अमोल कोल्हे यांनी पत्रकारांशी संवाद



साधला. ते म्हणाले की, महाविकास आघाडीचे सर्व नेते पाठीशी आहेत. भाजप आणि महायुती विरुद्ध जनता निवडणुकीत उतरली आहे. आढळराव पाटील यांनी १५ वर्षांत किती निधी आणला हे त्यांनी जाहीर करावं मी मतदारसंघात १९ हजार ५०० कोटी रुपये निधी आणू शकलो त्याचा मला आनंद, असल्याचे त्यांनी म्हटले आहे. आढळराव पाटील यांनी मतदारसंघात गेल्या १५ वर्षांत एक मोठा प्रकल्प आणलेला दाखवावा हे माझं त्यांना खुलं आव्हान असल्याचेही अमोल कोल्हे म्हणाले.

# उन्हाळी प्रवासाची चिंता मिटली; पुण्याहून 'या' शहरासाठी उन्हाळी विशेष ट्रेन

पुणे । प्रतिनिधी

उन्हाळ्याला सुरुवात झाली आहे. त्यामुळे शाळांना सुट्ट्या लागल्या आहे. यामुळे नागरिकांचा प्रवास वाढण्याची शक्यता आहे. प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी रेल्वेने उन्हाळी विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे.पुणे ते दानापूर, हजरत निजामुद्दीन आणि नागपूरसाठी उन्हाळी विशेष गाड्या चालवण्यात येणार आहेत.

१) पुणे–दानापूर–पुणे (८ ट्रिप)

गाडी क्रमांक ०१४७१ पुणे– दानापूर सुपरफास्ट द्वीसाप्ताहिक विशेष दिनांक ११.४.२०२४, १४.४.२०२४, ०२.५.२०२४ आणि ०५.५.२०२४ (गुरुवार,रविवार) रोजी पुण्याहून ०६.३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी १२.०० वाजता दानापूरला पोहोचेल.

गाडी क्रमांक ०१४७२ दानापूर – पुणे सुपरफास्ट द्वि साप्ताहिक विशेष एक्स्प्रेस दिनांक १२.४.२०२४, १५.४.२०२४, ०३.५.२०२४ आणि ०६.५.२०२४ (शुक्रवार,सोमवार) रोजी दानापूर येथून १३.३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी १९.४५ वाजता पुण्याला पोहोचेल.

थांबे कोणते असतील?

हडपसर, दौंड कार्ड लाइन, अहमदनगर, कोपरगाव, मनमाड, भुसावळ, खंडवा, इटारसी, जबलपूर, कटनी, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाल उपाध्याय जंक्शन, बक्सर आणि आरा

२) पुणे–नागपूर–पुणे (३८ ट्रीप)

गाडी क्रमांक ०११६६ पुणे–नागपूर सुपरफास्ट द्वी साप्ताहिक विशेष दिनांक १४.४.२०२४ ते १६.६.२०२४ (१९ ट्रिप) दरम्यान



प्रति मंगळवार, रविवार पुण्याहून१५.५० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ०६.३० वाजता नागपूरला पोहोचेल.

गाडी क्रमांक ०११६५ नागपूर – पुणे सुपरफास्ट द्वि साप्ताहिक विशेष दिनांक १३.४.२०२४ ते १५.४.२०२४ दरम्यान (१९ ट्रिप) प्रति सोमवार, शनिवार नागपूरहून १९.४० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी११.२५ वाजता पुण्याला पोहोचेल.

थांबे कोणते असतील?

उरुळी, दौंड कार्ड लाइन, अहमदनगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, भुसावळ, मलकापूर, अकोला, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा

३) पुणे–हज़रत निजामुद्दीन–पुणे (२४ ट्रीप)

गाडी क्रमांक ०१४९१ पुणे–हज़रत निज़ामुद्दीन साप्ताहिक सुपरफास्ट विशेष दिनांक १२.४.२०२४ ते २८ .६.२०२४ दरम्यान (१२ट्रिप)दर शुक्रवारी पुण्याहून१७.३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी १६.४५ वाजता हज़रत निज़ामुद्दीनला पोहोचेल. गाडी क्रमांक ०१४९२ हज़रत निज़ामुद्दीन – पुणे साप्ताहिक सुपर फास्ट विशेष दिनांक१३.४.२०२४ ते २९.६.२०२४ दरम्यान (१२ट्रिप ) दर शनिवारी हज़रत निज़ामुद्दीन येथून २२.१० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी २३.५५ वाजता पुण्याला पोहोचेल.

थांबे कोणते असतील?

लोणावळा,कल्याण, वसई रोड, सुरत, बडोदा, रतलाम,भवानीमंडी, कोटा, सवाई माधोपुर आणि मथुरा.

गाडी क्रमांक ०१४७१, ०११६५, ०११६६ आणि ०१४९१ साठी बुकिंग दिनांक ०८ एप्रिलपासून सर्व आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in वेबसाइटवर सुरू होईल. विशेष गाड्यांच्या थांबण्याच्या तपशीलवार वेळेसाठी www.enquiryindianrail.gov.in ला भेट द्या किंवा छ्ढएड प डाउनलोड करा. प्रवाशांनी या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आलं आहे.

# महापालिकेचा इशारा; 'या' तारखेनंतर रस्ते खोदाई केल्यास फौजदारी कारवाई

पिंपरी : पाणी पुरवठा विभाग, फायबर नेटवर्किंग, महावितरण, एमएनजीएची पाइपलाइन टाकण्यासह विविध कामांसाठी रस्ते खोदाई करण्याकरिता १५ मे २०२४ पर्यंत परवानगी दिली जाणार आहे. त्यानंतर विनापरवाना खोदाई केल्यास फौजदारी कारवाईचा इशारा पालिकेने दिला आहे.

विविध सेवा वाहिन्यांच्या कामासाठी वारंवार केले जाणारे खोदकाम आणि त्यानंतर केल्या जाणाऱ्या दुय्यम दर्जाच्या रस्ते दुरुस्तीमुळे शहरातून वाहने चालविणे अवघड होते. त्यामुळे लहान–मोठे अपघात होतात. ते टाळण्यासाठी शहरातील मुख्य रस्ते आणि अतिवर्दळीच्या रस्त्यांवरील जलवाहिन्या, जलनिस:रण वाहिका, पावसाळी गटारे, इंटरनेट आणि अन्य केबल, एमएनजीएल तसेच, वीज वाहिन्यांची कामे येत्या १५ मे पर्यंत पूर्ण करावीत, असे महापालिकेने स्पष्ट केले आहे. त्यानंतर खोदकामास परवाना दिला जाणार नाही. केवळ अत्यावश्यक बाब म्हणून काही कामांसाठी रस्ते खोदाईला परवानगी दिली जाणार आहे.

रस्त्यांची दुरुस्ती आणि डांबरीकरणाची कामे पावसाळ्यापूर्वी करण्यात येणार आहेत. त्याबाबतच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. पावसाळ्यात कोणत्याही कामासाठी रस्ते आणि पदपथ खोदकामास परवानगी दिली जाणार नाही. केवळ अत्यावश्यक आणि अतितातडीच्या कामांना अटी आणि नियम टाकून परवानगी दिली जाणार आहे. विनापरवाना खोदकाम केल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई तसेच, फौजदारी गुन्हा दाखल केला जाणार असल्याचे महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम यांनी सांगितले.